**पाहिजेत**

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

**शैक्षणिक**

शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/ 12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय


पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ०१ ला | शनिवार, दि. ११ जुलै २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

गुरुकुलच्या माध्यमातून ग्रामीण भागात आधुनिक शिक्षणाची गंगा पोहचविणारे

श्रीकृष्ण ग्रुप, कामती बु.।।

संस्थापक अध्यक्ष





# प्रा. प्रमोद आवताडे (MSc. B.Ed)

## यांचा प्रेरणादायी प्रवास


**मोहोळ तालुक्यातील विरवडे बुद्रुक या छोट्याशा गावात प्राध्यापक प्रमोद आवताडे यांचा जन्म झाला. वडिलांचे नाव शिवाजी तर आईचे नाव सखुबाई आहे. विद्या, अश्विनी दोन बहिणी व विनायक भाऊ असा त्यांचा परिवार. गावात केवळ दोन एकर जमिनीवर कुटुंबाचा गाडा चालत होता. घरातील हालाखीच्या परिस्थितीला तोंड देत प्रमोद आवताडे यांचे बालपण गेले. आई वडिलांनी दुसऱ्याच्या शेतात जाऊन मजुरी करून मुलांचे पालनपोषण केले. प्रा. आवताडे यांचे प्राथमि क व माध्यमिक शिक्षण गावातच पूर्ण झाले. पुढे त्यांनी शिवाजी विद्यापीठातून बी.एस.सी, बीएड तर सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथून एम.एस.सी पदवी घेतली पदवी प्राप्त केल्यावर त्यांनी कोल्हापूर येथील नामांकित शिक्षण संस्थेत कोचिंग क्लासचे प्राध्यापक म्हणून काम केले. येथे काम करत असताना आपल्या ग्रामीण भागात अशा संस्था निर्माण झाल्या तर नक्कीच आपले विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होईल, अशी कल्पना त्यावेळी त्यांच्या मनात आली. हे विचार वारंवार त्यांना झोपू देत नव्हते. घरची परिस्थीती बेताची होती, आर्थिक बळ कमकुवत होते. विचार मोठे होते. परंतु उराशी बाळगलेले स्वप्न सत्यात उतरवण्याची जिद्द होती.**

शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिकारक ज्योतिबा फुले यांच्या विचारांचे अवलोकन करून त्यांच्या पत्नीचे मामा हणमंत निकम व त्यांचे मामा ॲड. अर्जुनराव पाटील यांच्या सहकार्याने श्रीकृष्ण गुरुकुल संस्था काढायचे ठरवले. कोल्हापूर येथील नोकरी सोडून त्यांनी स्वप्नपूर्तीच्या मागे लागले. साथ, जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर सन २०१९-२०२० मध्ये वाघोली ता. मोहोळ येथे पहीले मुलाचे श्रीकृष्ण निवासी गुरुकुलची स्थापना केली शहरातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळत होते. आता या गुरुकुलाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळणार आहे. विद्येविना मती गेली, मती विना निती गेली, नीतिविना गती गेली, गतिविना वित्त गेले वित्ताविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले. महान क्रांतिकारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाबाबत केलेल्या पंक्तींप्रमाणे शिक्षणाचे महत्व त्यांना समजले होते. वाघोली गावातील माळरानावर त्यांनी विद्येची गंगा पोहचवली. सध्या हजारो विद्यार्थी या संस्थेत शिक्षण घेत आहेत. मुलांना गुरुकुलच्या क्षत्रछायेखाली उत्तम दर्जाचे शिक्षण, खेळ, जेवण, कपडे, राहण्यासाठी योग्य पद्धतीने करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाची कमतरता पूर्ण झाली पण मुलींच्या शिक्षणाचे काय ? हा देखील जिव्हाळ्याचा विषय होती. प्रा. आवताडे यांच्या सौभाग्यवती मोनिका व मामा हणमंत निकम मामी स्वाती निकम यांच्या कल्पक बुद्धीतून मोहोळ तालुक्यातील कामती बुद्रुक येथे श्री राधा गुरुकुल हे मुलींची निवासी संस्था चालू केली. या संस्थेत शेकडो मुली शिक्षण घेत आहेत. श्रीकृष्ण मुलांचे गुरुकुल व श्रीराधा मुलींचे गुरुकुल या दोन्ही संस्था अगदी नावारूपाला आल्या आहेत. या छोट्याशा रोपट्याचे आता वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

ही विश्वासार्हता पाहून कामती खुर्द ता. मोहोळ येथील एम. बी. चव्हाण या गुरुकुल संस्थेची जबाबदारी प्रा. प्रमोद आवताडे यांच्याकडे देण्यात आली आहे. या तिन्ही संस्थेत सोलापूर जिल्हा सोडून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या पालन पोषणासाठी लागणारे साहित्य त्वरित मिळावे म्हणून त्यांनी कामती बुटुक येथे श्रीकृष्ण सुपर मार्केट चालू केले. यामुळे कामती सारख्या बाजारपेठेच्या ठिकाणी नागरिकांची मोठी सोय झाली. आगे कूच करत असताना याच ठिकाणी श्रीकृष्ण पतसंस्था चालू करण्यात आली. समाजात पत नसलेल्या व्यक्तीस पतपुरवठा करून त्यांची समाजात पत निर्माण करणे हेच आमचे उद्दिष्ट आतापर्यंत या पतसंस्थेत कोटीपेक्षा जास्त उलाढाल झाल्याचे प्रा. प्रमोद आवताडे यांनी सांगितले. सामाजिक चळवळीत देखील त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांची मुलगी देविका हीचा वाढदिवस गरजूंना अन्नदान करून केला. नैसर्गिक आपत्तीमध्ये एखाद्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर त्याला आर्थिक मदत करणे अशा विविध सामाजिक उपक्रम श्रीकृष्ण संस्थेमार्फत राबवले जातात. पुढे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देवून त्याला घडवण्याचा प्रयत्न संस्थेचा असणार आहे. याचबरोबर श्रीकृष्ण शिक्षण संस्थेत मेडिकल, इंजिनिअरिंग, उद्योग शिक्षण देण्याचा मानस आहे. गुरुकुलच्या माध्यमातून ग्रामीण भागात आधुनिक शिक्षणाची गंगा पोहचविणारे प्रा. प्रमोद आवताडे यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी आहे.

| उपाध्यक्ष | सचिव | सहसचिव |
|---|---|---|
|  |  |  |
| श्री. हनुमंत निकम<br>Mob. : 9011338283 | सौ. स्वाती निकम (B.A)<br>Mob. : 9370807459 | सौ. मोनिका प्रमोद आवताडे (B.Com.)<br>Mob. : 9834264506 |

## श्रीकृष्ण गुरुकुलचे गुणवंत विद्यार्थी २०२४ - २०२५

| | | | |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| सुमित बोबडे 96.40% | शिवाजी काळदाते 93.60% | शिवराज सपाटे 93.60% | प्रविण वाघ 92.40% |
|  |  |  | |
| विशाल व्हरगर 92.20% | समर्थ जावळे 91.80% | समर्थ खटकाळे 90.40% | |

दैनिक **कटूसत्य** च्या

**वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !**


















# शेतकऱ्यांना दिलासा! 50 हजारांची अट काढली, 2 लाखांपर्यंत कर्ज माफ

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारने राज्यातील बळीराजासाठी एक ऐतिहासिक आणि अत्यंत मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी एका मोठ्या कर्जमाफीची घोषणा केली आहे.

महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा विस्तार करत सरकारने आता शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला आहे.

यापूर्वी या योजनेअंतर्गत केवळ 50000 रुपयांपर्यंतच्या प्रोत्साहनपर लाभाची तरतूद होती, मात्र आता ती वाढवून थेट 2 लाख रुपये करण्यात आली आहे. यासोबतच कर्ज फेडण्याची जाचक अटही सरकारने पूर्णपणे रद्द केली असून यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### कर्ज चुकावण्याची जाचक अटही संपवली

सरकारने केवळ कर्जमाफीची रक्कमच वाढवली नाही, तर शेतकऱ्यांसाठी आणखी एक महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत घोषणा करताना सांगितले की, प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ मिळवण्यासाठी 2026-27 या वर्षातील पीक कर्ज वेळेत फेडण्याची जी अट घालण्यात आली होती, ती आता पूर्णपणे रद्द करण्यात येत आहे. या अटीमुळे अनेक शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची भीती होती, मात्र आता अट काढल्याने सर्व पात्र शेतकऱ्यांना याचा थेट लाभ घेता येणार आहे.

या ऐतिहासिक निर्णयामागची भूमिका स्पष्ट करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कर्जमाफीमुळे कोणताही शेतकरी श्रीमंत होत नाही, पण अडचणीच्या काळात तो सावकाराच्या दारात जाण्यापासून नक्कीच वाचतो. शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढणे हेच या सरकारचे मुख्य उद्दिष्ट आहे.



विधानसभा निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारने पाऊल उचलले आहे. सरकारला वाटले असते तर हा निर्णय 2029 पर्यंत पुढे ढकलला जाऊ शकला असता, पण शेतकऱ्यांची सद्यस्थिती पाहता आम्ही आताच हा निर्णय घेण्याचे निश्चित केले, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांचे आंदोलन आणि आमदारांच्या दबावाचा परिणाम

शेतकऱ्यांच्या या कर्जमाफीसाठी आणि अटी शिथिल करण्यासाठी महायुतीचे अनेक आमदार सातत्याने सरकारकडे मागणी करत होते. आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखाली आमदारांच्या एका शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेटही घेतली होती. दुसरीकडे, या अटींविरोधात राज्यभरातून शेतकऱ्यांनी मोठे मोर्चे आणि आंदोलने केली होती. आमदार रोहित पवार यांनीही शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी उपोषण केले होते. या सर्व जनआंदोलनांची आणि दबावाची गंभीर दखल घेत सरकारने आपल्या नियमांवर पुनर्विचार केला आणि हा शेतकरी हिताचा निर्णय जाहीर केला.

### लाखो शेतकऱ्यांना मिळणार थेट फायदा

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, 2019 च्या कर्जमाफी योजनेतील लाभार्थ्यांना या निर्णयाचा थेट फायदा मिळणार आहे. राज्यातील 95 टक्के शेतकऱ्यांनी वेळेवर कर्जाचे हप्ते भरले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. आता 2026 मध्ये कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांशिवाय, मागील 3 वर्षांपैकी किमान 2 वर्षे नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ घेता येईल. महाराष्ट्राच्या इतिहासात अशा प्रकारचा निर्णय पहिल्यांदाच घेण्यात आला असल्याचा दावाही मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे सांगितले की, सरकार शेतकऱ्यांना दिलासा देण्यासोबतच राज्यातील बँकिंग व्यवस्था मजबूत ठेवण्यावरही लक्ष केंद्रित करत आहे. याशिवाय, राज्य सरकार दरवर्षी शेतकऱ्यांना सुमारे 25000 कोटी रुपयांची वीज बिल सवलतही देत आहे, अशी आठवण त्यांनी करून दिली. सरकारच्या या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल आणि शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी एक भक्कम आर्थिक आधार मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# शक्तीपीठ महामार्गाविरोधात आंदोलन तीव्र

## १८ जुलैला पंढरपुरात शेतकऱ्यांची 'सद्बुद्धी यात्रा'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाविरोधातील आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीने घेतला आहे. आगामी आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील १३ जिल्ह्यांतील बाधित शेतकरी १८ जुलै २०२६ रोजी पंढरपूर येथे भव्य जाहीर सभा आणि त्यानंतर 'सद्बुद्धी यात्रा' काढणार असल्याची माहिती माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिली.

पंढरपूरजवळील वाकरी मैदानावर १८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता शेतकऱ्यांची जाहीर सभा होणार आहे. त्यानंतर वाकरी ते श्री विठ्ठल मंदिर अशी हजारो शेतकऱ्यांची पायी सद्बुद्धी यात्रा काढण्यात येणार आहे. या यात्रेद्वारे राज्य सरकारने प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग तातडीने रद्द करावा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हा निर्णय घेण्याची सद्बुद्धी मिळावी, अशी सामूहिक प्रार्थना विठ्ठल चरणी करण्यात येणार असल्याचे राजू शेट्टी यांनी सांगितले.




आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पंढरपुरात येणार असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील १३ जिल्ह्यांतील शेतकरी या आंदोलनासाठी एकत्र येणार आहेत.

राजू शेट्टी यांनी आरोप केला की, शक्तीपीठ महामार्गामुळे नागपूर, वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील हजारो हेक्टर सुपीक शेती संपादित केली जाणार असून लाखो शेतकरी भूमिहीन होण्याचा धोका निर्माण झाला आहे. कोणतीही आवश्यकता नसताना केवळ कंत्राटदार आणि भांडवलदारांच्या फायद्यासाठी हा प्रकल्प राबवला जात असल्याचाही आरोप त्यांनी केला.

यापूर्वी या १३ जिल्ह्यांमध्ये शक्तीपीठ महामार्गाविरोधात मोर्चे, धरणे, आंदोलने, ग्रामसभा तसेच जिल्हा परिषद आणि नगरपालिका स्तरावर ठराव मंजूर करण्यात आले आहेत. मात्र, सरकारने अद्याप हा प्रकल्प अधिकृतपणे रद्द करण्याची घोषणा केलेली नसल्याने आता आंदोलनाची धार अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे शेट्टी यांनी सांगितले. १८ जुलै रोजी होणाऱ्या सभेत आंदोलनाची पुढील दिशा जाहीर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या सद्बुद्धी यात्रेत आमदार जयंत पाटील, विधान परिषदेचे गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार प्रणिती शिंदे, माजी मंत्री महादेव जानकर, आमदार कैलास पाटील, कॉम्रेड गिरीश फोंडे यांच्यासह विविध पक्षांचे आमदार, खासदार आणि शक्तीपीठ महामार्ग विरोधी आंदोलनातील पदाधिकारी सहभागी होणार आहेत.

हा लढा केवळ जमीन वाचवण्याचा नसून शेतकऱ्यांचे अस्तित्व, संस्कृती आणि रोजगार वाचवण्याचा असल्याचे सांगत शक्तीपीठ महामार्ग बाधित १३ जिल्ह्यांतील शेतकरी, महिला, कष्टकरी आणि तरुणांनी १८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता वाकरी (पंढरपूर) येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी समन्वय समिती आणि शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने राजू शेट्टी यांनी केले.

# तीन जिल्हाला वरदायिनी ठरलेले उजनी धरण अखेर 50 टक्क्यांकडे वाटचाल

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** पुणे जिल्ह्यातील भीमा खोऱ्यात गेल्या चार दिवसांपासून पावसाने उघडझाप होत असल्याने उजनी धरणांमध्ये येणाऱ्या पाण्याच्या आवकात कमी होत चालला आहे. त्यामुळे भीमा नदीवरील बहुतांश धरणांमधून सुरू असलेले विसर्ग कमी जास्त करण्यात होत आहे आज दौंड येथून उजनी धरणाकडे सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गातही गेल्या दोन दिवसांपेक्षा आज जास्त घट झाली आहे . प्रत्येक तासाला विसर्ग कमी होत असल्याने नदीपात्रातील पाण्याचा प्रवाहही मंदावला आहे.

गुरुवारी दि 9 जुलै सायंकाळी 7 वाजेपर्यंत दौंड येथून उजनी धरणात 53 हजार 53,717 क्यूसेक्स इतका विसर्ग सुरू होता. तर आज शुक्रवारी सायंकाळी 14 हजार 14062 ईतका येत आहे पुणे जिल्ह्यात पावसाची उघडीप कायम राहिल्यास या विसर्गात आणखी घट होण्याची शक्यता जलसंपदा विभागाकडून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, उजनी धरणातील पाणीसाठ्यात मात्र समाधानख वाढ



सुरू असून धरणाची पातळी हळूहळू वाढत आहे. शुक्रवार दिनांक 10 जुलै 2026 रोजी सायंकाळी 7 वाजेपर्यंत उजनी धरणातील एकूण पाणीसाठा 88.23 टीएमसी इतका झाला असून उपयुक्त पाणीसाठा 20.57 टीएमसी झाला आहे. धरण भरावाची टक्केवारी 45.87% टक्क्यांवर पोहोचली आहे. उद्या सकाळी 50% साठा होत असल्याचा पाटबंधारे विभागातून मत व्यक्त केले आहे

भीमा खोऱ्यात पुन्हा दमदार पावसाला सुरुवात झाल्यास उजनी धरणातील पाणीसाठ्यात वेगाने वाढ होऊन धरणाची वाटचाल पन्नास टक्क्यांच्या पुढे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या मात्र पावसाची पुणे जिल्ह्यातील काही भागात उघडझाप होत आहे त्यामुळे वरून उजनी धरणात येणारा विसर्ग जलसाठ्यात वाढीचा वेग मंदावला आहे, आगामी पावसावरच उजनीच्या पुढील भरावाची दिशा अवलंबून राहणार आहे. मात्र उजनी धरणावर अवलंबून असलेले शेतकरी उजनी धरण 50 टक्के होत असल्याने अनेक शेतकरी ऊस लागवड करण्यासाठी धावपळ करू लागले आहेत मात्र उजनीच्या डाव्या व उजव्या कालव्यातून पाणी सोडण्याचा अजूनही पाटबंधारे विभागाचा व राजकीय नेते मंडळींनी कुठली हालचाल न केल्याने शेतकऱ्यांचे याकडे लक्ष वेधले आहे.

### उजनी धरणाची पाणीस्थिती

- दि. 10 जुलै 2026, सायंकाळी 7:00 वा.
- धरणातील पाणीपातळी (RWL) : 494.080 मीटर
- जलसाठ्याचे क्षेत्रफळ : 263.20 चौ. कि.मी.
- एकूण पाणीसाठा (Gross Storage) : 2,498.73 दशलक्ष घनमीटर (MCum)
- = 88.23 टीएमसी
- उपयुक्त पाणीसाठा (Live Storage) : 695.92 दशलक्ष घनमीटर (MCum)
- = 24.57 टीएमसी
- उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी : 45.87%
- धरणातील पाण्याची आवक (Inflow):
- दौंड नदी मापन केंद्रावरील नदीची पाणीपातळी : 499.110 मीटर
- पुणे जिल्ह्यातून दौंड येथून उजनी धरणात येणारी पाण्याची आवक : 14,062 क्यूसेक

# सोलापूर जिल्हा बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु

## प्राधिकरणाकडून अहर्ता तारीख जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या बहुप्रतीक्षित निवडणुकीच्या प्रक्रियेला अखेर वेग आला असून, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने १ जुलै २०२६ ही मतदार पात्रतेसाठी (अहर्ता) कट-ऑफ तारीख निश्चित केली आहे.

या तारखेपर्यंत पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या मतदारांनाच निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळणार आहे.

या कट-ऑफ तारखेच्या आधारे प्राथमिक मतदार याद्या तयार करण्यात येणार असून, त्या बँकेकडून विभागीय सहनिबंधकांकडे सादर केल्या जातील. त्यानंतर अंतिम मतदार यादी आणि संचालक मंडळाच्या निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर होणार आहे.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी यासंदर्भातील पत्र बँकेचे प्रशासक तथा सहकार विभागाचे पुणे विभागीय निबंधक यांना पाठविले आहे. या पत्रामुळे




निवडणूक प्रक्रियेला अधिकृत सुरुवात झाल्याचे मानले जात आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष तथा माजी आमदार राजन पाटील यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळ २०१८ मध्ये बरखास्त करण्यात आले होते. त्यानंतर तब्बल आठ वर्षांनंतर संचालक मंडळाच्या निवडणुकीची प्रक्रिया प्रत्यक्षात सुरू होत असल्याने सहकार क्षेत्रात या घडामोडीकडे विशेष लक्ष लागले आहे.

दरम्यान, जिल्हा बँकेची निवडणूक तातडीने घेण्यात यावी, या मागणीसाठी बावची विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेने न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान १ जुलै रोजी न्यायालयाने प्रशासकांवर तीव्र नाराजी व्यक्त करत आठवडाभरात निवडणुकीचे वेळापत्रक सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतरच्या सुनावणीची अपेक्षा असताना त्या दिवशी प्रकरणावर सुनावणी होऊ शकली नाही. मात्र, निवडणूक प्राधिकरणाने अहर्ता तारीख निश्चित केल्याने निवडणूक प्रक्रियेला आता अधिकृत गती मिळाली आहे.

# १९-२० जुलैला सात मानाच्या पालख्यांचे सोलापूर जिल्ह्यात होणार आगमन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी एकादशी २५ जुलै रोजी होत असून, श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे मार्गस्थ होणाऱ्या महाराष्ट्रातील १० प्रमुख मानाच्या पालख्यांचे प्रस्थान आणि सोलापूर जिल्ह्यातील आगमनाचे वेळापत्रक जिल्हा प्रशासनाने जाहीर केले आहे.

या पालख्या १६ ते २० जुलै या कालावधीत टप्प्याटप्प्याने जिल्ह्यात दाखल होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.



### प्रमुख पालख्यांचे वेळापत्रक

- श्री संत ज्ञानेश्वर महाराज (आळंदी) : ८ जुलै रोजी प्रस्थान; १९ जुलै रोजी सोलापूर जिल्हा हद्दीत आगमन.
- श्री संत तुकाराम महाराज (देहू) : ७ जुलै रोजी प्रस्थान; २० जुलै रोजी जिल्ह्यात आगमन.
- श्री संत मुक्ताबाई (मुक्ताईनगर) : २४ जून रोजी प्रस्थान; १९ जुलै रोजी जिल्ह्यात आगमन.
- श्री संत सोपान महाराज (सासवड) : १२ जुलै रोजी प्रस्थान; २० जुलै रोजी जिल्ह्यात आगमन.
- श्री संत निवृत्तीनाथ महाराज (त्र्यंबकेश्वर) : २९ जून रोजी प्रस्थान; १८ जुलै रोजी जिल्हा हद्दीत प्रवेश.
- श्री संत एकनाथ महाराज : ७ जुलै रोजी प्रस्थान; १९ जुलै रोजी जिल्ह्यात आगमन.

### १९ आणि २० जुलैला सर्वाधिक पालख्या

जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार, १९ जुलै रोजी संत ज्ञानेश्वर महाराज, संत मुक्ताबाई, संत एकनाथ महाराज आणि संत निळोबाराय महाराज अशा चार मानाच्या पालख्या सोलापूर जिल्ह्यात दाखल होणार आहेत. तर २० जुलै रोजी संत तुकाराम महाराज, संत सोपान महाराज आणि चांगावटेश्वर देवस्थान यांच्या तीन पालख्यांचे आगमन होणार आहे. त्यामुळे या दोन दिवसांत जिल्ह्यात वारकऱ्यांची मोठी गर्दी अपेक्षित आहे.

लाखो वारकऱ्यांच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासनाने प्रत्येक पालखीसाठी नोडल अधिकारी आणि सहाय्यक समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. प्रवासादरम्यान कोणतीही अडचण निर्माण झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांशी किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष (०२१७-२७३१०१०) येथे संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने वारकरी आणि नागरिकांना केले आहे.

# अपर कार्यालयाचा वाद : मोहोळमधून दीडशे हरकती दाखल




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर येथील नवनवीन मंजूर झालेल्या अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाला मोहोळ तालुका जोडू नये, या मागणीसाठी मोहोळकरांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अस्थापना शाखेकडे आजतागायत सुमारे १५० हरकती नोंदविण्यात आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्णयाकडे लागले आहे.

शासनाने पंढरपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर करून त्यास माळशिरस, माढा, सांगोला, करमाळा, मंगळवेढा आणि मोहोळ हे तालुके जोडले आहेत. इतर तालुक्यांसाठी हे कार्यालय सोयीचे असले, तरी मोहोळसाठी ते अत्यंत गैरसोयीचे ठरत आहे. मोहोळ तालुक्यातील शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्यांचे दैनंदिन व्यवहार, बँकिंग, रुग्णालये, उच्च शिक्षण आणि बाजारपेठ गेल्या अनेक वर्षांपासून सोलापूरशी जोडलेली आहे.

पंढरपूरपेक्षा सोलापूर मोहोळकरांसाठी अधिक सोईस्कर आणि हक्काचे केंद्र आहे. त्यामुळे मोहोळ तालुक्याला या कार्यक्षेत्रातून वगळण्यासाठी सर्वपक्षीय नेते आणि संस्था एकवटल्या आहेत. आमदार राजू खरे, माजी आमदार राजन पाटील यांच्यासह विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, ग्रामपंचायती, विविध कार्यकारी सोसायट्या, अनगर नगरपंचायत आणि मोहोळ नगरपरिषद यांनी यात पुढाकार घेतला आहे.

जर मोहोळ तालुका यातून वगळला नाही, तर तीव्र संघर्ष उभारण्यासह न्यायालयीन लढा देण्याचा इशारा देण्यात आला आहे. यासाठी 'सर्वपक्षीय संघर्ष समिती' स्थापन करण्यात आली असून, आगामी काळात आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याची तयारीही बैठकीत दर्शवण्यात आली आहे.

### १२ जुलैला जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल


हरकती नोंदविण्याची मुदत संपल्यानंतर, जिल्हाधिकारी येत्या १२ जुलैला या सर्व हरकतींचा आणि परिस्थितीचा अंतिम अहवाल वरिष्ठांकडे सादर करणार आहेत. हा विषय महसूल मंत्र्यांपर्यंत पोहोचला असल्याने, ते मोहोळकरांच्या बाजूने निर्णय घेणार का? याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

# घरफोडी करणारे दोन सराईत चोरटे २४ तासांच्या आत जेरबंद; ६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील बसवेश्वर नगर, नई जिंदगी परिसरात झालेली मोठी घरफोडी अवघ्या २४ तासांच्या आत उघडकीस आणण्यात एमआयडीसी पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण (डब) पथकाला यश आले आहे. पोलिसांनी दोन सराईत चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल असा एकूण ६ लाख ३ हजार १८५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

उकाड्यामुळे दुसऱ्या घरात झोपायला गेले अन् घर फोडले!

फियार्दी गौरीशंकर नागनाथ कोळी (वय ५५, रा. बसवेश्वर नगर, नई जिंदगी, सोलापूर) हे नेहमीच्या राहत्या




घरात रात्रीच्या वेळी उकाडा होत असल्याने बाजूलाच असलेल्या त्यांच्या दुसऱ्या घरामध्ये कुटुंबासह झोपण्यास गेले होते. ६ जुलै २०२६ रोजी रात्री १०:३० वाजता त्यांनी घर कुलूप लावून बंद केले होते. ७ जुलै २०२६ रोजी पहाटे ५:३० वाजता ते उठून बाहेर आले असता, त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडलेले दिसले. अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील ड्रॉवरमध्ये ठेवलेले २८.९५ ग्रॅम सोन्याचे दागिने, ३६४ ग्रॅम चांदीचे दागिने आणि २५,००० रुपये रोख रक्कम असा एकूण ५,०३,१८५ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांचा तातडीने तपास; शांतीनगरजवळ रचला सापळा

पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्रीच्या वेळी घरफोडीची गंभीर घटना घडल्याने पोलीस उप-आयुक्त प्रितम यावलकर, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रताप पोमण, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊराव बिराजदार आणि गुन्हे पोलीस निरीक्षक संगीता पाटील यांनी तात्काळ तपासाचे आदेश दिले.

गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख पोलीस उप-निरीक्षक अल्फाज शेख व त्यांच्या पथकाने घटनास्थळाला भेट देऊन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी सुरू केली. दरम्यान, पथकातील पोलीस अंमलदार अमर शिवशिंगवाले आणि नागेशसिंग चव्हाण यांना गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी शांतीनगरजवळ सापळा रचून दोन संशयितांना त्यांच्या मोटरसायकलसह शिताफीने ताब्यात घेतले.

**अटक केलेल्या आरोपींची नावे:**

१. जिब्रान उर्फ शोएब युनूस शेख (वय २१ वर्षे, मूळ रा. ९५०/१, बी कॅम्प, रंगभवन रोड, सोलापूर; सध्या रा. बसवेश्वर नगरजवळ, भीमाशंकर नगर, नई जिंदगी, सोलापूर)

२. प्रशांत नागेश खंदारे (वय १९ वर्षे, रा. केशव नगर, इ.ओ.पट्टी, मौलाली चौक, सोलापूर)

२४ तासांत गुन्हा उघड; ६.०३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

पोलिसांनी दोन्ही आरोपींकडे कसून चौकशी केली असता त्यांनी या घरफोडीच्या गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींकडून चोरीला गेलेले सर्व दागिने आणि रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

- २८.९५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने
- ३६४ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने
- नगद २५,०००/- रुपये रोख रक्कम
- गुन्ह्यात वापरलेली १,००,०००/- रुपये किमतीची मोटरसायकल आणि स्क्रू ड्रायव्हर
- एकुण जप्त मुद्देमालः ६,०३,१८५/- रुपये

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**


दैनिक
कटूसत्यच्या
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक :-
मा. श्री. राजाभाऊ माने
भारतीय जनता पार्टी एस सी मोर्चा सचिव महाराष्ट्र राज्य


N.R.PATIL FINANCE
DEVELOPERS & BUILDER
WE CREATE EXTRAORDINARY PROPERTIES
दैनिक कटूसत्यच्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक :
मा. श्री . नामदेव पाटील
माजी सरपंच
एन. आर. पाटील डेव्हलपर्स
९८८१९६३७३८ / ७७७४९७७४४४
हॉटेल श्रीवर्धन
पुणे - सोलापूर महामार्गावर, अर्जुनसोंड फाटा,
अर्जुनसोंड , ता. मोहोळ, जि . सोलापूर


दैनिक
कटूसत्य च्या
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक:-
मा. श्री. गणेश भाऊ चिवटे
जिल्हा सरचिटणीस, भाजपा.
जिल्हा नियोजन समिती सदस्य, सोलापूर

## संपादकीय

# परफुटी, विद्यार्थ्यांचे भविष्य आणि सत्तेची संवेदनाहीनता

देशाची खरी संपत्ती कोणती, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर एकच देशातील युवक आणि विद्यार्थी. त्यांच्या गुणवत्तेवर, मेहनतीवर आणि प्रामाणिक स्पर्धेवर देशाचे भविष्य उभे असते. मात्र गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियांमधील पेपरफुटीच्या घटनांनी लाखो विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत केला आहे. अनेक वर्षे रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी हा थेट अन्याय आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे या गंभीर प्रश्नावर सरकारकडून अपेक्षित ती तातडी, संवेदनशीलता आणि राजकीय जबाबदारी दिसून येत नाही. पेपरफुटी ही केवळ प्रशासकीय चूक नाही; ती गुणवत्तेवर, प्रामाणिकपणावर आणि संविधानाने दिलेल्या समान संधीच्या तत्त्वावर झालेला आघात आहे. परीक्षा रद्द होतात, भरती प्रक्रिया लांबते, वयोमयार्दा ओलांडण्याची भीती निर्माण होते, आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ओझे येते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मेहनतीवरचा विश्वास कमी होतो. जेव्हा परीक्षा वारंवार रद्द होतात, तेव्हा विद्यार्थ्यांच्या मनात एकच प्रश्न निर्माण होतो. मेहनतीपेक्षा गैरव्यवहारच अधिक प्रभावी ठरत आहेत का? याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर उपोषणाचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या आंदोलनामुळे शिक्षण व्यवस्था, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचा मुद्दा पुन्हा एकदा राष्ट्रीय चर्चेत आला आहे. कोणत्याही आंदोलनाशी सहमत किंवा असहमत असणे वेगळा विषय असू शकतो; परंतु लोकशाहीत शांततामय आंदोलनाचा अधिकार हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार आहे. अशा आंदोलनांकडे दुर्लक्ष करणे किंवा त्याविषयीची चर्चा कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका होत असेल, तर त्या टीकेलाही सरकारने गांभीर्याने उत्तर देणे आवश्यक आहे. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून केली जात आहे. संसदीय लोकशाहीत अशा मागण्या नवीन नाहीत. मात्र कोणत्याही मंत्र्याने पदावर राहावे की नाही, हा निर्णय राजकीय आणि घटनात्मक प्रक्रियेनुसार घेतला जातो. त्यामुळे सरकारने या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडणे, चौकशीची माहिती जनतेसमोर ठेवणे आणि दोषींवर ठोस कारवाई होत असल्याचा विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. मौन किंवा विलंब यामुळे संशय अधिक गडद होतो. लोकशाहीत सरकारची ताकद टीका दडपण्यात नसते, तर टीकेला तथ्यांनी उत्तर देण्यात असते. माध्यमे, विद्यार्थी, पालक आणि समाज प्रश्न विचारत असतील तर त्यांना विरोधक म्हणून नव्हे, तर लोकशाहीतील भागीदार म्हणून पाहिले पाहिजे. कारण प्रश्न विचारले जातात ते सरकार पाडण्यासाठी नव्हे, तर व्यवस्था सुधारण्यासाठी. आज गरज आहे ती राजकीय आंरोप-प्रत्यारोपांपेक्षा परीक्षा व्यवस्थेतील व्यापक सुधारणांची. पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर, स्वतंत्र देखरेख यंत्रणा, जलद न्यायप्रक्रिया आणि दोषींना निश्चित शिक्षा याशिवाय पर्याय नाही. विद्यार्थ्यांचा विश्वास परत मिळवायचा असेल तर केवळ आश्वासने पुरेशी ठरणार नाहीत; कृती दिसली पाहिजे. देशाचा विकास हा विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर उभा असतो. त्या स्वप्नांवर पेपरफुटीचे सावट पडत असेल, तर तो केवळ शिक्षणाचा प्रश्न राहत नाही; तो राष्ट्राच्या भविष्यासंबंधीचा प्रश्न बनतो. त्यामुळे सरकारने टीकेकडे दुर्लक्ष करण्याऐवजी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि ठोस सुधारणा यांचा मार्ग स्वीकारणे, हाच लोकशाहीला साजेसा आणि विद्यार्थ्यांप्रती न्याय करणारा मार्ग ठरेल.

# लोकसंख्या : विकासाचा पाया की आव्हान?

दरवर्षी ११ जुलै हा दिवस संपूर्ण जगभर 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वाढत्या लोकसंख्येची आकडेवारी मांडण्यात नसून, लोकसंख्या आणि शाश्वत विकास यांच्यातील परस्परसंबंध समजून घेण्यात आहे. १९८७ साली जगाची लोकसंख्या पाच अब्जांचा टप्पा ओलांडल्यानंतर लोकसंख्या वाढीचे सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक परिणाम लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने १९८९ मध्ये ११ जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून घोषित केला. आज जगाची लोकसंख्या आठ अब्जांहून अधिक झाली असून भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला आहे. ही बाब एकाच वेळी अभिमानाची, संधीची आणि चिंतनाची आहे. कारण लोकसंख्या ही राष्ट्राची सर्वात मोठी मानवी संपत्ती असली, तरी तिचे योग्य नियोजन आणि गुणवत्तापूर्ण विकास न झाल्यास ती अनेक समस्यांचे मूळ ठरू शकते.

लोकसंख्या म्हणजे केवळ एखाद्या देशात राहणाऱ्या लोकांची संख्या नव्हे. ती त्या राष्ट्राची कार्यशक्ती, उत्पादनक्षमता, सांस्कृतिक वैविध्य, ज्ञानसंपदा आणि सामाजिक प्रगतीचे प्रतीक असते. प्रत्येक राष्ट्राचा विकास हा तेथील लोकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. निरोगी, सुशिक्षित, कुशल, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेली आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार लोकसंख्या देशाला प्रगतीच्या शिखरावर नेऊ शकते. परंतु शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवेतील असमानता, बेरोजगारी, गरिबी, संसाधनांची कमतरता आणि सामाजिक विषमता यामुळे वाढती लोकसंख्या विकास प्रक्रियेसाठी गंभीर आव्हान ठरू शकते. त्यामुळे आज लोकसंख्या नियंत्रण हा शब्द मागे पडून लोकसंख्या व्यवस्थापन, लोकसंख्येची गुणवत्ता आणि मानवी विकास या संकल्पनांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारतातील लोकसंख्येचा इतिहास पाहिला तर स्वातंत्र्यानंतर आरोग्यसेवा, लसीकरण, औषधोपचार, अन्नधान्य उत्पादन आणि स्वच्छता यामध्ये मोठी सुधारणा झाली. यामुळे मृत्युदर झपाट्याने कमी झाला; परंतु काही दशकांपर्यंत जन्मदर तुलनेने जास्त राहिल्याने लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली. कालांतराने शिक्षणाचा प्रसार, महिलांचे सक्षमीकरण, शहरीकरण, आरोग्य सुविधांचा विस्तार आणि कुटुंब नियोजनाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अनेक राज्यांमध्ये प्रजनन दरात घट झाली आहे. तथापि, भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशात लोकसंख्या विषयक चित्र सर्वत्र सारखे नाही. काही राज्यांमध्ये लोकसंख्या स्थिरतेकडे वाटचाल होत असताना काही भागांमध्ये अजूनही तुलनेने जास्त प्रजनन दर दिसून येतो. त्यामुळे लोकसंख्या धोरण तयार करताना प्रादेशिक गरजा लक्षात घेणे आवश्यक ठरते.

लोकसंख्या वाढीचा सर्वाधिक परिणाम नैसर्गिक संसाधनांवर होतो. जमीन, पाणी, जंगल, ऊर्जा, अन्नधान्य आणि खनिज संपत्ती ही संसाधने मर्यादित आहेत. लोकसंख्या वाढत गेली की या संसाधनांवरील ताणही वाढतो. शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्र कमी होत जाते, भूजलाची पातळी खालावते, जंगलतोड वाढते, जैवविविधतेचा ऱ्हास होतो आणि पर्यावरणीय समतोल बिघडतो. हवामान बदलाच्या गंभीर संकटाच्या पार्श्वभूमीवर वाढती लोकसंख्या आणि संसाधनांचा अनियंत्रित वापर ही चिंतेची बाब ठरत आहे. म्हणूनच शाश्वत विकासाचा विचार करताना लोकसंख्या व्यवस्थापनाला केंद्रस्थानी ठेवणे अत्यावश्यक आहे.

शहरीकरण हा वाढत्या लोकसंख्येचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि आधुनिक जीवनशैलीच्या शोधात लाखो लोक ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर करतात. परिणामी महानगरांमध्ये लोकसंख्येची प्रचंड गर्दी होते. निवासस्थानांची कमतरता, झोपडपट्ट्यांचा विस्तार, वाहतूक कोंडी, जल, वायू व ध्वनी प्रदूषण, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापनाच्या समस्या आणि सार्वजनिक आरोग्यावरील वाढता ताण ही वाढत्या शहरी लोकसंख्येची प्रमुख आव्हाने आहेत. यावर उपाय म्हणून नियोजनबद्ध शहरी विकास, उपग्रह शहरांची निर्मिती, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि पायाभूत सुविधांचा समतोल विस्तार आवश्यक आहे.

लोकसंख्या आणि आरोग्य यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. माता व बाल आरोग्य, पोषण, सुरक्षित प्रसूती, बालमृत्यू कमी करणे, किशोरवयीन आरोग्य, लसीकरण, प्रजनन आरोग्य आणि कुटुंब नियोजन या सर्व बाबी लोकसंख्या व्यवस्थापनाशी संबंधित आहेत. निरोगी माता आणि निरोगी बालक हे निरोगी समाजाचे आधारस्तंभ असतात. प्रत्येक दांपत्याला कुटुंबाचा आकार ठरविण्याचा अधिकार आहे. त्यासाठी त्यांना अचूक माहिती, समुपदेशन, आधुनिक गर्भनिरोधक साधने आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. कुटुंब नियोजन म्हणजे लोकसंख्या कमी करण्याचा कार्यक्रम नसून आरोग्यदायी, आनंदी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंब घडविण्याचा प्रयत्न आहे.

महिलांचे शिक्षण आणि सक्षमीकरण हे लोकसंख्या स्थिरतेचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. जेव्हा मुलींना उच्च शिक्षण, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक सुरक्षितता मिळते, तेव्हा विवाहाचे वय वाढते, मातृत्वाचे नियोजन होते, कुटुंब नियोजनाचा स्वीकार वाढतो आणि संपूर्ण कुटुंबाचे जीवनमान उंचावते. शिक्षित महिला आपल्या मुलांच्या आरोग्य, शिक्षण आणि पोषणाबाबत अधिक सजग असतात. म्हणूनच 'एक मुलगी शिकली तर दोन कुटुंबे घडतात' हे विधान लोकसंख्या व्यवस्थापनाच्या संदर्भातही तितकेच महत्त्वाचे ठरते.

भारतासमोर आज सर्वात मोठी संधी म्हणजे त्याची युवा लोकसंख्या होय. देशातील मोठा वर्ग हा कार्यक्षम वयोगटात आहे. यालाच 'लोकसंख्यात्मक लाभांश' असे म्हटले जाते. जर या युवकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक कौशल्ये, डिजिटल साक्षरता, रोजगार, उद्योजकतेसाठी प्रोत्साहन आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या, तर भारत जगातील सर्वात शक्तिशाली अर्थव्यवस्थांपैकी एक बनू शकतो. परंतु याच युवकांना रोजगार मिळाला नाही, कौशल्यांचा अभाव राहिला आणि विकास प्रक्रियेत सहभाग मिळाला नाही, तर बेरोजगारी, असंतोष, गुन्हेगारी आणि सामाजिक अस्थिरता वाढण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

रोजगार आणि लोकसंख्या यांचा परस्परसंबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढत्या लोकसंख्येसाठी वाढत्या रोजगार संधी निर्माण करणे आवश्यक असते. आजच्या काळात केवळ पारंपरिक नोकऱ्यांवर अवलंबून राहणे शक्य नाही. कृषी प्रक्रिया उद्योग, पर्यटन, सेवा क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा, जैवतंत्रज्ञान, ई-कॉमर्स, स्टार्टअप्स आणि स्वयंरोजगार या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. शिक्षण व्यवस्थेनेही रोजगारक्षम कौशल्यांवर भर दिला पाहिजे.

लोकसंख्या वाढीचा परिणाम शिक्षण व्यवस्थेवरही होतो. विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना शाळा, महाविद्यालये, शिक्षक, प्रयोगशाळा, वाचनालये आणि डिजिटल सुविधा यांचीही वाढ आवश्यक ठरते. दर्जेदार शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले नाही तर सामाजिक विषमता वाढते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक आणि कौशल्याधारित शिक्षणावर दिलेला भर हा लोकसंख्येच्या गुणवत्तापूर्ण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

पर्यावरण आणि लोकसंख्या यांचा संबंध आज अधिक गंभीर झाला आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलांची तोड, प्रदूषण, कार्बन उत्सर्जन, पाण्याचा अतिवापर आणि जैवविविधतेचे नुकसान वाढत आहे. हवामान बदलामुळे पूर, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक जीवनशैली, जलसंवर्धन, ऊर्जा बचत, वृक्षारोपण आणि कचरा व्यवस्थापन या बाबींमध्ये लोकसहभाग आवश्यक आहे. लोकसंख्येचे व्यवस्थापन आणि पर्यावरण संरक्षण ही एकमेकांना पूरक अशीच प्रक्रिया आहे.

जागतिक लोकसंख्या दिनाचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे लिंगभाव समानता होय. मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव दूर करणे, बालविवाह रोखणे, महिलांना समान संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या आरोग्याचे संरक्षण करणे हे शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे. महिलांच्या निर्णयक्षमतेचा आदर करणारा समाजच लोकसंख्या व्यवस्थापनात यशस्वी ठरतो.

भारतातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाला सात दशकांहून अधिक इतिहास आहे. भारत हा अधिकृत राष्ट्रीय कुटुंब नियोजन कार्यक्रम सुरू करणारा जगातील पहिला देश मानला जातो. कालानुरूप या कार्यक्रमात मोठे बदल झाले. आज हा कार्यक्रम सक्तीऐवजी स्वेच्छा, माहितीपूर्ण निवड, आरोग्य हक्क आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांवर आधारित आहे. आशा सेविका, अंगणवाडी कर्मचारी, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि विविध आरोग्य मोहिमांद्वारे ग्रामीण आणि दुर्गम भागातही जनजागृती करण्यात येत आहे. तरीही काही ठिकाणी अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक रूढी आणि अपुऱ्या सुविधा यांमुळे अपेक्षित प्रगती झालेली नाही. त्यामुळे लोकजागृती आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा या दोन्ही गोष्टींना समान महत्त्व देणे आवश्यक आहे.

लोकसंख्या विषयक धोरण आखताना वृद्ध लोकसंख्येचाही विचार करावा लागतो. आयुर्मान वाढल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. त्यांच्यासाठी आरोग्य सेवा, सामाजिक सुरक्षा, निवृत्ती वेतन, मानसिक आरोग्य, वृद्धाश्रमांऐवजी समुदायाधारित सेवा आणि सन्मानपूर्वक जीवन यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. एका बाजूला युवा लोकसंख्या आणि दुसऱ्या बाजूला वाढती वृद्ध लोकसंख्या या दोन्ही घटकांचा समतोल साधणे हे आधुनिक लोकसंख्या धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

तंत्रज्ञानामुळे लोकसंख्या व्यवस्थापन अधिक परिणामकारक झाले आहे. डिजिटल आरोग्य नोंदी, कृत्रिम बुद्धिमत्ता, भौगोलिक माहिती प्रणाली, मोबाईल आरोग्य सेवा, टेलिमेडिसिन आणि डेटा विश्लेषण यांच्या साहाय्याने आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविता येतात. जनगणना, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण आणि विविध लोकसंख्याशास्त्रीय अभ्यास यांच्या आधारे शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे सुलभ होते. अचूक आकडेवारीशिवाय प्रभावी नियोजन शक्य नसते.

लोकसंख्या व्यवस्थापनामध्ये स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमे, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने योग्य माहितीचा प्रसार होऊ शकतो. लोकसंख्येविषयक अनेक गैरसमज दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी माध्यमांनी सकारात्मक भूमिका बजावणे आवश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये लोकसंख्या शिक्षण, आरोग्य शिक्षण आणि जीवनकौशल्य शिक्षण यांचा समावेश केल्यास भावी पिढी अधिक जबाबदार नागरिक म्हणून घडू शकते.

जागतिक लोकसंख्या दिन हा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की, लोकसंख्या ही समस्या नाही; तर तिचे अयोग्य नियोजन ही समस्या आहे. जर प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार शिक्षण, आरोग्य सेवा, पोषण, स्वच्छता, सुरक्षित निवास, रोजगार आणि समान संधी उपलब्ध झाल्या, तर मोठी लोकसंख्या हे राष्ट्राचे सर्वात मोठे सामर्थ्य ठरते. आज जगातील अनेक विकसित देशांना कामगारांची कमतरता भासत आहे, तर भारताकडे प्रचंड युवा मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्यामुळे या मानवी संपत्तीचे ज्ञान, कौशल्य आणि नवोपक्रमामध्ये रूपांतर करणे ही काळाची गरज आहे.

आजच्या डिजिटल आणि जागतिकीकरणाच्या युगात लोकसंख्येचा प्रश्न केवळ एका देशापुरता मर्यादित राहिलेला नाही. हवामान बदल, अन्नसुरक्षा, पाणी, स्थलांतर, आरोग्य आणि आर्थिक विकास या सर्व बाबींवर लोकसंख्येचा प्रभाव पडतो. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्तता करताना लोकसंख्या व्यवस्थापनाला विशेष महत्त्व दिले जात आहे. गरिबी निर्मूलन, दर्जेदार शिक्षण, चांगले आरोग्य, लिंगभाव समानता, स्वच्छ पाणी, सन्मानजनक रोजगार आणि पर्यावरण संरक्षण ही सर्व उद्दिष्टे लोकसंख्येच्या गुणवत्तापूर्ण विकासाशी जोडलेली आहेत.

भारतातील प्रत्येक नागरिकाने छोट्या आणि सुजाण कुटुंबाची संकल्पना स्वीकारणे, महिलांचा सन्मान करणे, मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, संसाधनांचा काटकसरीने वापर करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. लोकसंख्या विषयक प्रश्न केवळ शासन सोडवू शकत नाही; त्यासाठी समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. जनजागृती, शिक्षण, आरोग्य सेवा आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातूनच लोकसंख्या आणि विकास यांच्यातील संतुलन साधता येईल.

शेवटी, जागतिक लोकसंख्या दिन हा केवळ दिनविशेष नसून मानवी विकासाचा, सामाजिक उत्तरदायित्वाचा आणि शाश्वत भविष्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. लोकसंख्येची संख्या वाढण्यापेक्षा तिची गुणवत्ता वाढणे अधिक महत्त्वाचे आहे. सुशिक्षित, निरोगी, कौशल्यसंपन्न, पर्यावरण-जागरूक आणि समान संधी मिळालेली लोकसंख्या हेच कोणत्याही राष्ट्राचे खरे सामर्थ्य असते. लोकसंख्या, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सामाजिक न्याय यांचा समतोल राखत विकासाची वाटचाल केली, तर भारत केवळ सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश राहणार नाही, तर सर्वाधिक सक्षम, समृद्ध आणि मानवी मूल्यांचा आदर करणारे राष्ट्र म्हणून जगासमोर आदर्श निर्माण करेल. जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आपण सर्वांनी जबाबदार नागरिक म्हणून लोकसंख्येच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी हातभार लावण्याचा निर्धार केला, तरच विकसित, समृद्ध आणि शाश्वत भारताचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# सोलापूर एनटीपीसी प्रमुखपदी मोहन व्ही. यांची नियुक्ती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एनटीपीसी सोलापूरच्या प्रकल्प प्रमुख म्हणून मोहन व्ही. यांनी १० जुलै २०२६ रोजी अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला आहे.

मोहन व्ही. यांनी रायपूर येथील 'रविशंकर विश्वविद्यालय' मधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली आहे. त्यांनी वर्ष १९९० मध्ये 'एक्झिक्युटिव्ह ट्रेनी' म्हणून एनटीपीसी मध्ये आपल्या यशस्वी कारकिर्दीची सुरुवात केली होती. आपल्या सुमारे ३६ वर्षांच्या प्रदीर्घ आणि उत्कृष्ट सेवाकाळात त्यांनी एनटीपीसीच्या बाल्को (कोरबा), तालचेर कनिहा, सीपत, सोलापूर आणि खरगोन यांसारख्या विविध प्रमुख व महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये आपली भूमिका यशस्वीपणे पार पाडली आहे.



आपल्या कार्यकाळात त्यांनी परिचालन (Operation) विभागात काम करताना प्लांटची कार्यक्षमता, उत्कृष्टता आणि विश्वसनीयता वाढवण्यात उल्लेखनीय योगदान दिले आहे. एनटीपीसी सोलापूरच्या प्रकल्प प्रमुखपदाची धुरा सांभाळण्यापूर्वी, त्यांनी एनटीपीसी खरगोन येथे महाव्यवस्थापक (इंधन व्यवस्थापन आणि परिचालन व अनुरक्षण - O&M विभाग) तसेच प्रकल्प प्रमुख म्हणून कार्य केले आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर महाव्यवस्थापक (परिचालन व अनुरक्षण) शुभाशिस बंदोपाध्याय, अप्पर महाव्यवस्थापक (मानव संसाधन) कन्हैया दास यांच्यासह एनटीपीसी सोलापूरमधील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन नवनियुक्त प्रकल्प प्रमुख मोहन व्ही. यांचे उत्साहात स्वागत केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## वात्रटिका

### न दिसणारी धुसफूस

घडलेल्या घटनांवर त्यांची
अशी दिसली रिएक्शन...
गर्दी झाली सत्तेच्या डब्यात
आणि पटले नाही ऑपरेशन...
उघड काही बोलले जात नाही
आत मध्ये मात्र धुसफूस आहे...
पेटलेल्या वादाचा भडका व्हावा
यासाठी कोणाची फूस आहे...


**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# शेततळ्यात पडलेल्या कोल्ह्याला मिळाले जीवदान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील पोखरापूर येथे शेततळ्यात पडलेल्या एका कोल्ह्याला सुखरूप बाहेर काढून त्याला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. 'वाईल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशन, सोलापूर' (WCAS) च्या रेस्क्यू पथकाने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने ही मोहीम राबवून कोल्ह्याला जीवदान दिले.

**दोन दिवसांपासून अडकला होता कोल्हा**

पोखरापूर येथील शेतकरी महेश विश्वनाथ वाघमारे यांच्या शेततळ्यात दोन दिवसांपूर्वी एक कोल्हा अपघाताने पडला होता. शेततळ्याच्या रचनेमुळे त्याला स्वतःहून बाहेर पडणे शक्य होत नव्हते, त्यामुळे तो तिथेच अडकून पडला होता. या घटनेची माहिती मिळताच



वाईल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशनचे उमेश सरगर यांनी त्वरित संतोष धाकपाडे यांना याविषयी कळवले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून WCAS च्या रेस्क्यू पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

**नियोजनबद्ध रेस्क्यू आणि सुटका**

पथकातील सदस्यांनी आवश्यक ती सर्व खबरदारी घेत, नियोजनबद्ध पद्धतीने बचाव मोहीम सुरू केली. काही वेळातच कोल्ह्याची शेततळ्यातून सुखरूप सुटका करण्यात आली. बाहेर काढल्यानंतर कोल्ह्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्याला कोणतीही जखम झाली नसल्याची आणि प्रकृती उत्तम असल्याची खातरजमा केल्यानंतर, त्याला सुरक्षितपणे त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात आले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' माहितीपटाचा प्रीमियर

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनी संयुक्तपणे निर्मित 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाचा आयनॉक्स चित्रपटगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रीमियर शो झाला. या 'प्रीमियर शो' साठी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक वर्षा आंधळे, आदी उपस्थित होते.



हा माहितीपट पंढरपूर वारीची प्रत्यक्ष अनुभूती देतो. या चित्रपटागृहामध्ये जणू काही पंढरपूरची वारी प्रत्यक्षात उतरली असल्याचेही अनुभव येत असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

**थोडक्यात माहितीपट**

'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' हा २२ मिनिटांचा माहितीपट वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. या माहितीपटाचे मराठी, इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलगु, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात येत आहे. विविध भाषांमधील या माहितीपटाचे प्रसारण डिस्कव्हरी, डिस्कव्हरी एचडी, टीएलसी, टीएलसी एचडी, ॲनिमल प्लॅनेट, ॲनिमल प्लॅनेट एचडी, इन्व्हेस्टिगेशन डिस्कव्हरी (आयडी), डिस्कव्हरी सायन्स, डिस्कव्हरी टर्बो अशा ९ वाहिन्यांवरुन करण्यात येत आहे.

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या पाठपुराव्याला यश

## सांगोल्यासाठी नीरा देवधर कालव्यातून १ टीएमसी पाण्याच्या कामाला गती

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला तालुक्याच्या पाणीप्रश्नाच्या कायमस्वरूपी निराकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या नीरा देवधर कालवा योजनेतील १ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या कामाला गती देण्याबाबत मंत्रालयात महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. माढा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी खासदार तथा मार्गदर्शक मा. श्री. रणजितसिंह (दादा) नाईक-निंबाळकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जानेवारी २०२३ मध्ये राज्य मंत्रिमंडळाने नीरा देवधर कालवा योजनेत बाष्पीभवनामुळे होणाऱ्या पाण्याच्या बचतीतून १ टीएमसी पाणी सांगोला मतदारसंघासाठी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. त्या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने ही बैठक आयोजित करण्यात आली.



महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे) मा. श्री. राधाकृष्णजी विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्वेक्षण अहवाल, प्रस्तावित कामाची तांत्रिक प्रक्रिया, निविदा प्रक्रिया आणि पुढील कामाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना सर्व प्रशासकीय आणि तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून कामाला गती देण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. बैठकीत सांगोला मतदारसंघासाठी नीरा देवधर कालव्यातून १ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासन कटिबद्ध असल्याचे सांगत, हे काम प्राधान्याने पूर्ण केले जाईल, असे आश्वासन मा. जलसंपदा मंत्री राधाकृष्णजी विखे-पाटील यांनी दिले.

सांगोला तालुका हा राज्यातील कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त पट्ट्यात मोडत असल्याने पिण्याच्या पाण्याची, शेतीसाठी सिंचनाची आणि जनावरांच्या पाण्याची समस्या वर्षानुवर्षे गंभीर राहिली आहे. अशा परिस्थितीत नीरा देवधर कालव्यातून १ टीएमसी पाणी उपलब्ध झाल्यास तालुक्यातील हजारो शेतकरी, पशुपालक आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. भविष्यातील पाणी नियोजनासाठीही हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या योजनेचा पाठपुरावा करताना मा. रणजितसिंह (दादा) नाईक-निंबाळकर यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून सांगोला तालुक्याच्या न्याय्य हक्काच्या पाण्यासाठी ठाम भूमिका मांडली होती.

त्यांच्या प्रयत्नांमुळेच राज्य मंत्रिमंडळाने ऐतिहासिक निर्णय घेतला आणि आता त्या निर्णयाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत.

याप्रसंगी आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार शहाजी (बापु) पाटील, जिल्हाध्यक्ष तथा सोलापुर जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत इ आदी मान्यवर तसेच निरा देवधर कालवा समितीचे अधिकारी वर्ग उपस्थित होते.

सांगोला तालुक्याच्या पाणीप्रश्नाच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असून, लवकरात लवकर काम पूर्ण होऊन पाणी उपलब्ध व्हावे, अशी अपेक्षा तालुक्यातील नागरिक, शेतकरी आणि विविध सामाजिक संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

> माढा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी खासदार तथा आमचे मार्गदर्शक मा. श्री. रणजितसिंह (दादा) नाईक-निंबाळकर साहेब यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नीरा देवधर कालव्यातून सांगोल्यासाठी १ टीएमसी पाणी मंजूर करण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला. आता या निर्णयाच्या अंमलबजावणीला गती मिळत आहे, ही सांगोल्याच्या जनतेसाठी दिलासादायक बाब आहे. देवाभाऊंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणारा प्रत्येक कार्यकर्ता सांगोल्याच्या हक्काच्या पाण्यासाठी खंबीरपणे उभा आहे. शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कासाठीचा हा लढा थांबणार नाही. विकासाच्या प्रत्येक प्रश्नावर देवाभाऊंसोबत खांद्याला खांदा लावून आम्ही उभे आहोत आणि सांगोल्याला त्याचा हक्क मिळवून देण्यासाठी आमचा संघर्ष अधिक जोमाने सुरू राहील.
>
> **– चेतनसिंह केदार सावंत,** जिल्हाध्यक्ष तथा सोलापुर जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती


# शासकीय कार्यालयांनाच रेनवॉटर हार्वेस्टिंगचा विसर!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** पावसाचे पाणी साठवून भूजलपातळी वाढविण्यासाठी शासनाने रेनवॉटर हार्वेस्टिंग (पर्जन्यजल संचयन) प्रणाली बंधनकारक केली असली, तरी सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील अनेक शासकीय कार्यालयांमध्येच या नियमाची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचे चित्र समोर आले आहे. परिणामी, पाणी बचतीबाबत जनजागृती करणाऱ्या शासकीय यंत्रणांच्याच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

नगररचना नियमांनुसार ५०० चौरस मीटरपेक्षा अधिक छताचे क्षेत्रफळ असलेल्या सर्व नवीन शासकीय व सार्वजनिक इमारतींमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा उभारणे बंधनकारक आहे. तर मुंबई आणि पुण्यासारख्या महानगरांमध्ये ही मर्यादा २०० चौरस मीटर इतकी आहे. मात्र, अनेक कार्यालयांमध्ये अद्याप ही व्यवस्था कार्यान्वित झालेली नाही.

यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. जलसंपदा विभागाकडून नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन करण्यात येत असतानाच, अनेक शासकीय कार्यालयांमध्ये पर्जन्यजल संचयनाची सुविधा नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, अनेक शासकीय कार्यालये जुन्या इमारतींमध्ये कार्यरत आहेत, तर




काही कार्यालये भाड्याच्या इमारतींमध्ये असल्याने रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा उभारण्यात तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणी येत आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी या कामाची अंमलबजावणी रखडली आहे.

### रेनवॉटर हार्वेस्टिंग म्हणजे काय?

रेनवॉटर हार्वेस्टिंग म्हणजे पावसाचे पाणी वाहून जाऊ न देता ते गोळा करून साठवणे किंवा जमिनीत मुरविण्याची शाश्वत पद्धत. छतावर पडणारे पाणी पाइपद्वारे गाळून टाक्यांमध्ये साठवले जाते किंवा भूजलपातळी वाढविण्यासाठी जमिनीत मुरविले जाते. यामुळे भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होते.याबाबत जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल क्षीरसागर यांनी सांगितले की, जलसंधारण विभागाच्या सर्व इमारतींमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था करण्यात आली असून, बहुतांश शासकीय इमारतींनीही ही यंत्रणा उभारली आहे. शासनाच्या निर्देशानुसार नवीन बांधकामांमध्ये पर्जन्यजल संचयन अनिवार्य करण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# त्रिस्तरीय तक्रार निवारण समिती स्थापन

## १५ दिवसांत नोटीस व सुनावणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** खासगी अनुदानित, विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध तक्रारींचा निपटारा आता स्थानिक पातळीवरच होणार आहे. यासाठी राज्य शासनाने त्रिस्तरीय तक्रार निवारण समिती स्थापन केली असून, तक्रार दाखल झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत संबंधितांना नोटीस बजावून सुनावणी घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षकांना न्यायासाठी कोटार्चे उंबरठे झिजवण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

राज्य शासनाने प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांसाठी स्वतंत्र तक्रार निवारण समित्यांची स्थापना केली आहे. विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली प्राथमिक व माध्यमिक शाळांची समिती, तर महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली उच्च माध्यमिक शाळांसाठी स्वतंत्र समिती कार्यरत राहणार आहे.

तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित पक्षांना १५ दिवसांच्या आत नोटीस बजावून त्यांची बाजू ऐकली जाणार असून, शक्य तितक्या लवकर प्रकरणांचा



निपटारा करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सचिन जगताप यांनी सांगितले की, शिक्षक किंवा कर्मचाऱ्यांनी प्रथम शिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार करणे अपेक्षित आहे. तेथे समाधान न झाल्यास विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे दाद मागता येईल. त्यानंतरही समाधान न झाल्यास शिक्षण संचालकांकडे अपील करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

तक्रार निवारण समितीला शिस्तभंग आणि दंडात्मक कारवाईची शिफारस करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. कर्मचारी दोषी आढळल्यास नियमानुसार कारवाईची शिफारस केली जाईल. तसेच, संस्थाचालकांनी शिक्षकांच्या हक्कांवर गदा आणणारे किंवा नियमबाह्य आदेश दिल्यास ते आदेश रद्द करण्याची शिफारसही समिती करू शकते.

लैंगिक छळ किंवा बालकांच्या सुरक्षिततेशी संबंधित गंभीर प्रकरणांमध्ये समिती तातडीने पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची तसेच संबंधित संस्थेविरुद्ध कठोर प्रशासकीय कारवाईची शिफारसही करू शकणार आहे.

### कोणत्या तक्रारींवर होणार सुनावणी?

या समित्यांकडे खालील विषयांवरील तक्रारींची सुनावणी केली जाणार आहे.

* शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वैयक्तिक मान्यता नाकारणे.
* बदलीसंदर्भातील तक्रारी.
* अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती.
* शालार्थ आयडी न देणे.
* अर्धवेळ कर्मचाऱ्यांचे प्रश्न.
* वेतनवाढ, वेतन सुधारणा आणि वेतनश्रेणी.
* अतिरिक्त कामाचा बोजा.
* पेन्शन व निवृत्तीवेतन.
* अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन.

# नाला क्रमांक १ प्रकरणात महापालिकेला दिलासा

## सर्वोच्च न्यायालयाचा स्थगिती देण्यास नकार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** होटगी रोडवरील नाला क्रमांक १ पूर्ववत करण्याच्या सोलापूर महापालिकेच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने दिलेला दुजोरा सर्वोच्च न्यायालयानेही कायम ठेवला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती अथवा 'जैसे थे' आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिल्याने नैसर्गिक नाल्याचा प्रवाह पूर्ववत करण्यासाठी महापालिकेला आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत काम सुरू ठेवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी १० ऑगस्ट रोजी होणार असून, तोपर्यंत संबंधित प्रतिवादींना उत्तर व प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, होटगी रोडवरील मुलतानी बेकरी कॉर्नर ते दक्षिण मध्य रेल्वे नाल्याच्या मिळणीपर्यंतचा नाला क्रमांक १ हा नैसर्गिक नाला असल्याची नोंद भारतीय सर्वेक्षण विभागाच्या १९७८ आणि २००१ च्या टोपोशीटमध्ये आहे. मात्र, लेआऊट विकासाच्या काळात हा नाला मूळ मार्गावरून सुमारे ९० अंशांनी वळवून दुसऱ्या नाल्याशी जोडण्यात आल्याने त्याच्या वहनक्षमतेवर परिणाम झाला. सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीदरम्यान नवोदयनगर, मुलतानी बेकरी परिसर आणि मजरेवाडी येथे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाल्यानंतर महापालिकेने हा विषय आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने गंभीर मानत टोपोशीट, भू-आकृती सर्वेक्षण, गुगल प्रतिमा, क्षेत्रीय पाहणी आणि तांत्रिक अहवालांच्या आधारे नाल्याची मूळ अलाइनमेंट निश्चित करून तो पूर्ववत करण्याचा निर्णय घेतला होता. हा प्रकल्प महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर १९ नाल्यांच्या योजनेत समाविष्ट आहे.

या निर्णयाविरोधात भोपळे, विलास ताकमोगे आणि मारुती ताकमोगे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. मात्र, उच्च न्यायालयाने महापालिकेची भूमिका ग्राह्य धरत याचिका फेटाळून लावली. त्यानंतर या निर्णयाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमति याचिका दाखल करण्यात आली. बुधवारी न्यायमूर्ती आर. महादेवन आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठासमोर प्राथमिक सुनावणी झाली. न्यायालयाने प्रतिवादींना नोटीस बजावत उत्तर आणि प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले. मात्र, उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिल्याने महापालिकेच्या कामाला कोणताही अडथळा राहिलेला नाही.

महापालिकेच्यावतीने वरिष्ठ विधिज्ञ मीनाक्षी अरोरा यांच्यासह ॲड. विश्वनाथ पाटील यांनी बाजू मांडली, तर याचिकाकर्त्यांतर्फे वरिष्ठ विधिज्ञ विनय नवरे आणि ॲड. सारंग आराध्ये यांनी युक्तिवाद केला.

### स्थगिती नसल्याने काय होणार?

- नाला क्रमांक १ पूर्ववत करण्याचे काम सुरू ठेवता येणार.
- पूरनियंत्रण आणि नैसर्गिक जलप्रवाह सुरळीत करण्याच्या उपाययोजना वेगाने राबविता येणार.
- सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी १० ऑगस्ट रोजी होणार.
- तोपर्यंत संबंधित प्रतिवादी उत्तर व प्रतिज्ञापत्र दाखल करणार.

याबाबत ॲड.विश्वनाथ पाटील यांनी सांगितले की, संबंधित नोटिसा आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत बजावण्यात आल्या असून सार्वजनिक हित लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती किंवा 'जैसे थे' आदेश देण्यास नकार दिला आहे.

# मैंदर्गी अतिउच्चदाब उपकेंद्राला तत्त्वतः मंजुरी; ५२ गावांचा वीजप्रश्न मार्गी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यातील शेती आणि ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक सक्षम व सुरळीत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, महापारेषणच्या १३२ के.व्ही./३३ के.व्ही. क्षमतेच्या मैंदर्गी अतिउच्चदाब उपकेंद्राला तत्त्वतः मंजुरी मिळाली आहे. ही माहिती आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.



या उपकेंद्राच्या उभारणीनंतर दुधनी, मैंदर्गी, बोरोटी आणि मिरजगी येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांवरील अतिरिक्त भार कमी होणार असून, शेतीपंपांसह ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक स्थिर, दर्जेदार आणि अखंडित होण्यास मदत होणार आहे. यामुळे कमी दाबाचा वीजपुरवठा, तांत्रिक बिघाड आणि वारंवार होणारे वीजखंडित होण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात कमी होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा लाभ अक्कलकोट तालुक्यातील एकूण ५२ गावांना होणार आहे. नियमित वीजपुरवठा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक वीज वेळेत मिळेल, परिणामी कृषी उत्पादनात वाढ होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

याबाबत बोलताना आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले की, अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांना दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा मिळावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

यातूनच मैंदर्गी अतिउच्चदाब उपकेंद्राला तत्त्वतः मंजुरी मिळाली असून, हा तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा आहे.

"मैंदर्गी अतिउच्चदाब उपकेंद्राला मिळालेली मंजुरी ही अक्कलकोट तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वाची आहे. यामुळे ५२ गावांतील वीजविषयक अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होतील.

शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यास माझे प्राधान्य कायम राहील."

**– आ. सचिन कल्याणशेट्टी**

# 'आम्हाला टीईटी, तुम्हाला मात्र गुवाहाटी!' सोलापुरात शिक्षकांचा विराट मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** "रद्द करा... रद्द करा... टीईटी परीक्षा रद्द करा... बीएलओंची नेमणूक रद्द करा... आम्हाला टीईटी आणि तुम्हाला मात्र गुवाहाटी!" अशा घोषणांनी गुरुवारी सोलापूर शहर दणाणून गेले. टीईटी परीक्षा आणि मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावलोकन (एसआयआर) मोहिमेसाठी शिक्षकांवर सोपविण्यात आलेली बीएलओची जबाबदारी रद्द करण्याच्या मागणीसाठी शहर व जिल्ह्यातील हजारो शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढत सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

राज्यातील शिक्षकांवर वाढत चाललेल्या अशैक्षणिक कामांच्या निषेधार्थ आणि "आम्हाला शिकवू द्या" या प्रमुख मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी शाळबंद आंदोलनाला सोलापुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

चार हुतात्मा पुतळ्यापासून जिल्हा परिषदेच्या पूनम गेटपर्यंत काढण्यात आलेल्या मोर्चात हजारो शिक्षक सहभागी झाले होते. पूनम गेट येथे मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाले.

यावेळी विविध शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सरकारवर जोरदार टीका करत शिक्षकांकडील अशैक्षणिक कामे तातडीने रद्द करून त्यांना पूर्णवेळ




अध्यापनासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

शिक्षक सहकार संघटनेचे राज्य सरचिटणीस नीलेश देशमुख यांनी शिक्षकांचा अनुभव विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी वापरला जावा, प्रशासनाच्या इतर कामांसाठी नव्हे, असे स्पष्ट मत व्यक्त केले.

आंदोलनात शिक्षक समितीचे राज्य उपाध्यक्ष राजन सावंत, मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष श्यामराव जवंजाळ, शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पवार, शिक्षक भारतीचे राज्याध्यक्ष नवनाथ गेंड, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष वीरभद्र यादवाड यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

चार हुतात्मा पुतळा ते जिल्हा परिषदेच्या पूनम गेटपर्यंतच्या मार्गावर हजारो शिक्षक सहभागी झाल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली.

पोलिसांनी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवून परिस्थिती नियंत्रणात ठेवली.

सरकारकडून सकारात्मक संकेत शिक्षकांच्या राज्यव्यापी आंदोलनाची दखल घेत सरकारने शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींशी तातडीने चर्चा सुरू केली आहे. शालेय शिक्षणमंत्र्यांसोबत प्राथमिक बैठक झाली असून, कार्यरत शिक्षकांसाठी स्वतंत्र टीईटी परीक्षा घेणे आणि यापुढे शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती न करणे या मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली आहे.

यासंदर्भात महसूल विभागासोबतही बैठक होणार असल्याची माहिती शिक्षक सहकार संघटनेचे राज्य सरचिटणीस नीलेश देशमुख यांनी दिली.

### २०७१ शाळा बंद; ६,३७३ शिक्षक आंदोलनात

शाळबंद आंदोलनाला जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागातील २,८२५ शाळांपैकी २,०७१ शाळा बंद राहिल्या, तर ७५४ शाळा सुरू होत्या. जिल्ह्यातील ८,४८८ शिक्षकांपैकी ६,३७३ शिक्षकांनी आंदोलनात सहभाग घेतला, तर २,११५ शिक्षक शाळेत उपस्थित होते. महापालिकेच्या शाळांमध्ये मात्र अध्यापन सुरळीत सुरू होते.मोर्चात सहभागी झालेल्या तसेच शाळेत उपस्थित राहिलेल्या शिक्षकांचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला असून, शासनाच्या निर्देशानुसार पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.

**जाहिर प्रसिध्दीकरण**

तमाम नागरिकांना कळिवण्यात येते की, गट नं.१२/३/३/२ मौजे शिवाजी नगर, पुणे रोड, सोलापूर येथील रस्ते, दिवाबत्ती व ओपन स्पेस इ. ताब्यात घेणे कामी संबंधित लेआऊटधारक श्री. रोहित सुनील फुरडे यांनी विनंती अर्ज केल्यावरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील १९४९ चे कलम २२३ व २२४ चे तरतुदीनुसार वरील लेआऊटमधील रस्ते, दिवाबत्ती व ओपन स्पेस इ. सोलापूर महानगरपालिकेचे ताब्यात घेऊन ती सार्वजनिक म्हणून जाहिर करणेत येत आहे. तमाम नागरिकांचे ३० (तीस) दिवसाचे आत सुचना व हरकती न आल्यास हे जाहिर प्रसिध्दीकरण अंतिम समजले जाईल. ताब्यात घेणेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | आकार |
|---|---|---|
| १ | रस्ते | २००४.८१ चौ.मी. |
| २ | दिवाबत्ती | ०७ नग स्वतंत्र मीटर, स्वीच बॉक्स अर्थिंग सह, ३२A FPMCB, टायमर स्वीच |
| ३ | ओपन स्पेस | ८४८.०० चौ.मी. |

सही/-
(वीणा पवार)
अतिरिक्त आयुक्त - १
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

# भाविकांच्या सुरक्षेसाठी सीपीआर व प्रथमोपचार प्रशिक्षण शिबिर संपन्न

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकरी भाविक देशभरातून सोलापूर जिल्ह्यात दाखल होत असतात. या काळात पाण्यात पडणे/बुडणे, शारीरिक थकवा, फिट येणे, रक्तदाबातील चढ-उतार, रक्तातील साखरेचे असंतुलन, दम्याचा झटका यांसारख्या प्रसंगांमुळे जीवितहानी होण्याचा धोका वाढतो. अशा आपत्कालीन परिस्थितीत तातडीने व शास्त्रोक्त पद्धतीने हृदय-फुफ्फुस पुनरुज्जीवन (सीपीआर) व प्रथमोपचार दिल्यास अनेकांचे प्राण वाचवणे शक्य होते.

याच उद्देशाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपूरवाड तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली व बी. व्ही. जी. इंडिया लिमिटेड १०८ एमएएमएस यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती, माळशिरस येथे एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले.



### प्रशिक्षणात कोणाला मार्गदर्शन

आषाढी यात्रेदरम्यान आपत्कालीन प्रसंगात तत्काळ मदत करण्यासाठी यंत्रणा सक्षम करणे गरजेचे असल्याने या शिबिरात माळशिरस तालुक्यातील आशा स्वयंसेविका, आरोग्य सेवक, सीएचओ, कर्मचारी, स्वयंसेवक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना सीपीआर व प्रथमोपचाराचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

### 'योग्य वेळी सीपीआर' हीच जीव वाचविण्याची गुरुकिल्ली'

शिबिरात सांगण्यात आले की, भाविकांच्या गर्दीत पाण्यात पडण्याच्या घटना घडल्यास किंवा कोणाला अचानक त्रास झाल्यास फक्त विलंब न करता तांत्रिकदृष्ट्या योग्य सीपीआर केल्यास मेंदूला ऑक्सिजन पुरवठा टिकून राहतो आणि जीवितहानी टाळता येते. म्हणून प्रशिक्षणाबरोबरच दैनंदिन सराव व वेळोवेळी उजळणी आवश्यक असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

### मागील अनुभवातून अधिक सक्षम बचावकार्य

यावेळी प्रशिक्षणाच्या गरजेबाबत सांगण्यात आले की, गेल्या चार वर्षात सीपीआरच्या माध्यमातून आपत्ती स्वयंसेवकांनी ३० हून अधिक वारकरी भाविकांचे प्राण वाचविण्यात यश मिळवले आहे. या यशाच्या पार्श्वभूमीवर आषाढी यात्रेतील बचावकार्य आणखी प्रभावी, तांत्रिकदृष्ट्या सक्षम व समन्वयपूर्ण करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले.

### तज्ज्ञांकडून सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण

शिबिरात डॉ. अनिल काळे, डॉ. कौस्तुभ घाटूळे आणि युवराज वाघ यांनी सीपीआर व प्रथमोपचार विषयक सैद्धांतिक माहिती व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले. तसेच 'Good Samaritan' ॲपचा वापर कसा करावा, आपत्कालीन प्रसंगात माहिती कशी हाताळावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

मॅनिकिनच्या साहाय्याने सीपीआरची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके देण्यात आली, जेणेकरून सहभागी व्यक्तींना वास्तविक प्रसंगात योग्य पद्धतीने कृती करता येईल.

### मार्गदर्शन व कार्यक्रमाला पाठबळ

माळशिरस तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात पंचायत समिती सभापती मा. दत्तात्रय मगर यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

### समारोपप्रसंगी सभापतींचे मार्गदर्शन

समारोपप्रसंगी पंचायत समिती सभापती दत्तात्रय मगर म्हणाले :

'सीपीआर ही संजीवनी असून योग्य वेळी शास्त्रोक्त पद्धतीने दिल्यास व्यक्तीचा जीव वाचवता येतो. त्यासाठी नियमित सराव व प्रशिक्षण आवश्यक आहे. आषाढी यात्रेदरम्यान जीवित संरक्षणासाठी आपल्याला सज्ज राहणे गरजेचे आहे.'

आषाढी यात्रेदरम्यान आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत करण्यासाठी माळशिरस तालुक्यातील स्वयंसेवक व आरोग्य कर्मचारी सशक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित हे प्रशिक्षण शिबिर महत्त्वपूर्ण ठरले.

सहभागी व्यक्तींना सीपीआर, प्रथमोपचार व आपत्कालीन व्यवस्थापनाबाबत तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न यशस्वीपणे पूर्ण झाला.

# अविनाश कुलकर्णी स्मृती पुरस्कार पत्रकार रवींद्र देशमुख यांना जाहीर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** ज्येष्ठ पत्रकार कै. अविनाश व्यंकटेश कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'कै. अविनाश कुलकर्णी स्मृती आदर्श पत्रकार पुरस्कार' यंदा दैनिक लोकमतचे मुख्य उपसंपादक रविंद्र देशमुख यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा सोमवार, १३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.



या सोहळ्यात महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते देशमुख यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात येणार आहे.

कै. अविनाश कुलकर्णी यांनी अनेक वर्षे निस्वार्थ भावनेने पत्रकारिता करत समाजहिताच्या प्रश्नांना वाचा फोडली. पत्रकारितेतील मूल्ये जपत त्यांनी अनेक तरुण पत्रकारांना मार्गदर्शन करून घडविण्याचे कार्य केले. त्यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात आणि पत्रकारितेला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने त्यांच्या सहकाऱ्यांपैकी एका सहकाऱ्याने

या पुरस्कारासाठी पुढाकार घेतला आहे. यंदा या पुरस्काराचे दुसरे वर्ष आहे. पुरस्काराचे मानकरी रविंद्र देशमुख हे गेल्या तीन दशकांपासून पत्रकारितेला व्रत मानून कार्यरत आहेत. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रातील विविध घडामोडींवर त्यांनी सातत्याने अभ्यासपूर्ण लेखन केले असून, पत्रकारितेतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत यंदाच्या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे आणि खजिनदार किरण बनसोडे यांनी केले आहे.

**जाहीर प्रसिध्दीकरण** क्र/अभिलेख/कावि ४४१/२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री. प्रकाश यशवंत जाधव वय - ५० वर्षे, धंदा-शेती, रा. अनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरुद्ध**

नगरपंचायत अनगर, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी नगरपंचायत अनगर, यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**


ज्याअर्थी वर नमुद अर्जदार म्हणजेच प्रकाश यशवंत जाधव यांचा जन्म ता. २१/१०/१९७६ रोजी मौजे अनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार म्हणजेच प्रकाश यशवंत जाधव याची जन्म दाखल्याची ता. २१/१०/१९७६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑक्टोबर १९७६ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच प्रकाश यशवंत जाधव याची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि./२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १०/७/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन**


दैनिक कटूसत्य च्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
-: शुभेच्छुक :-
शिवाजीराजे वागज मित्र मंडळ


दैनिक कटूसत्य च्या
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक:-
इनामदार स्क्रॅप मर्चंट
प्रो.प्रा. हुजूर इनामदार
मो:- 9730072786
पत्ता:- कुरुल रोड, मोहोळ जि. सोलापूर


दैनिक कटूसत्य च्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
-: शुभेच्छुक :-
ॲड. सागर अ. बेरूणगीकर
बी. कॉम,एल. एल. बी (स्पे),एम. बी. ए
मो. ९८६०११६०३७, ८३९०१६५३५३
पत्ता:- गाळा नं.६ सनशाईन अपार्टमेंट,
पहिला मजला, दक्षिण सदर बझार, सोलापूर-३


दैनिक कटूसत्यच्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
ॲड. जगदीश कोंडी
बी. एस. एलएल.बी., एम.एस. डब्ल्यू .
(नोटरी भारत सरकार)
रा. ९१९, भवानी पेठ, सोलापूर.
मो. : ९८६०२०५०७८


दैनिक कटूसत्यच्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक:-
मा.श्री. प्रभाकर चांदणे
अध्यक्ष, अखिल भारतीय डाळिंब
उत्पादक संघ सांगोला जि. सोलापूर


दैनिक कटूसत्य च्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक :-
सौ. अश्विनी
कांबळे-अब्दुले
नगरसेविका, करमाळा नगरपरिषद


दैनिक कटूसत्य च्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक :-
मा.श्री. श्रीमंत औदुंबरराजे भोसले
संस्थापक – हिंदवी स्वराज्य ग्रुप,
मा. सरपंच ग्रामपंचायत नेरले, तालुका - करमाळा


दैनिक कटूसत्य च्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
कल्पतरू नर्सरी & हॉटेल
KALPTARU VEG
शेटफळ-पंढरपूर रोड, मोडनिंब,
ता. माढा जि. सोलापूर
मो - 9860141485


दैनिक कटूसत्यच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
॥ श्री स्वामी समर्थ ॥
प्रो. रेवणसिध्द नि. पाटील
8087249836
9673757477
अक्कलकोट मधील सुप्रसिध्द
श्री लक्ष्मी दुग्धालय व स्विट मार्ट
शाखा क्र. १ : मंगरूळे हायस्कुल चौक, बायपास रोड, जंगी प्लॉट, अक्कलकोट
शाखा क्र. २ : मंगरूळे हायस्कुल चौक, टोळ अंबाबाई मंदिराजवळ, अक्कलकोट
शाखा क्र. ३ : भारत गॅस गोडाऊनशेजारी, स्टेशन रोड, अक्कलकोट.
शाखा क्र. ४ : अक्कलकोट-सोलापूर महामार्ग, ब्यागेहळ्ळी फाट्यापुढे,
तोतला फार्म हाऊसशेजारी, अक्कलकोट, जि. सोलापूर.
शाखा क्र. ५ : एस.टी.स्टॅन्डसमोर, स्वामी कॉम्प्लेक्स, मादनहिप्परगा,
ता.आळंद, जि. कलबुर्गी


दैनिक कटूसत्य च्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक:-
मा.श्री. सज्जन पाटील, लांबोटी

# सोलापूर महानगरपालिकेची विशेष स्वच्छता मोहीम यशस्वी



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल व आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या आदेशानुसार दि. १ जुलै ते ९ जुलै २०२६ या कालावधीत शहरातील सर्व ८ झोनमधील २६ प्रभागांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. या मोहिमेत लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे अधिकारी, आरोग्य निरीक्षक, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट तसेच नागरिकांचा सक्रिय सहभाग लाभला. मोहिमेसाठी विभागीय अधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक आरोग्य निरीक्षक आणि स्वच्छता क्षेत्र निश्चित करण्यात आले होते.

या मोहिमेदरम्यान रस्ते, चौक, सार्वजनिक ठिकाणे, नाले, पदपथ, खुल्या जागा, बाजारपेठा आणि शासकीय परिसरांची विशेष स्वच्छता करण्यात आली. कचरा संकलन, दगड–माती व मलबा हटविणे, अनधिकृत पोस्टर्स व बॅनर्स काढणे, झुडपे व गवत हटविणे, रस्ते धुणे तसेच डिव्हायडर व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता अशा विविध कामांची अंमलबजावणी करण्यात आली. मोहिमेदरम्यान महानगरपालिकेचे जमादार, झाडूवाले, बिगारी व सफाई कामगार यांनी सहभाग घेतला. या कालावधीत शहरातून सुमारे ९८.५ टन कचरा उचलण्यात आला, तर १९०.५ ब्रास दगड, माती व मलबा हटविण्यात आला. यासाठी महानगरपालिकेचे जेसीबी, डंपर, घंटागाड्या आणि पाणी टँकर/ट्रॅक्टर यांचा वापर करण्यात आला. विविध ठिकाणी झुडपे हटविणे, गवत उचलणे व डिव्हायडरवरील माती साफ करण्याची कामेही करण्यात आली.

विशेष स्वच्छता मोहिमेमुळे शहरातील सार्वजनिक परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांसाठी सुरक्षित करण्यास मोठी मदत झाली असून भविष्यातही अशा विशेष मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे तसेच आपले सोलापूर शहर नेहमी स्वच्छ राखण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करणेबाबत सोलापूर महानगरपालिकेकडून आवाहन करण्यात आले.

# FEMA प्रकरणांतील तडजोडींवरून ईडीच्या कार्यपद्धतीवर प्रश्न

## PMLA कारवायांशी तुलना करत विरोधकांचा निशाणा

**पुणे (कटूसत्य वृत्त):–** अंमलबजावणी संचालनालय (ईडी)च्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. विशेषतः परकीय चलन व्यवस्थापन कायदा (FEMA) अंतर्गत दाखल झालेल्या अनेक प्रकरणांमध्ये तडजोड (Compounding) आणि प्रकरणे निकाली काढण्याच्या प्रक्रियेवरून विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. दुसरीकडे, मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायदा (PMLA) अंतर्गत दाखल होणाऱ्या प्रकरणांमध्ये मात्र दीर्घकालीन तपास आणि कठोर कारवाई होत असल्याचा आरोप केला जात आहे. विरोधकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या सुमारे 15 महिन्यांत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ने FEMA अंतर्गत 150 हून अधिक प्रकरणे निकाली काढली असून, त्यासाठी ईडीने 'नो ऑब्जेक्शन' दिल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणांमध्ये संबंधित कंपन्यांनी आणि व्यक्तींनी नियमानुसार दंड भरल्यानंतर प्रकरणे निकाली निघाल्याचा दावा करण्यात येत आहे.

या संदर्भात अपोलो हॉस्पिटल्स समूहाशी संबंधित एका प्रकरणाचा उल्लेख केला जात आहे. विरोधकांच्या दाव्यानुसार, शेकडो कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराशी संबंधित प्रकरणात कंपनीने आणि संबंधित संचालकांनी दंड भरल्यानंतर प्रकरण निकाली काढण्यात आले. तसेच मिंत्रा (फ्लिपकार्ट समूहाची कंपनी) संदर्भातील FEMA प्रकरणाचाही उल्लेख करत, आर्थिक दंडानंतर प्रकरण संपुष्टात आल्याचा दावा केला जात आहे. याउलट, राजकीय नेत्यांविरुद्ध दाखल होणारी अनेक प्रकरणे PMLA अंतर्गत नोंदवली जात असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. या कायद्यांतर्गत अटक, मालमत्ता जप्ती आणि दीर्घकालीन तपासाची प्रक्रिया अधिक कठोर असल्याने, दोन कायद्यांतील कारवाईच्या स्वरूपात मोठा फरक असल्याचा मुद्दा उपस्थित केला जात आहे.

कायदेतज्ज्ञांच्या मते, FEMA आणि PMLA हे दोन्ही कायदे स्वरूपाने भिन्न आहेत. FEMA हा मुख्यतः नागरी (Civil) स्वरूपाचा कायदा असून परकीय चलन व्यवहारांतील उल्लंघनांशी संबंधित आहे. अशा काही प्रकरणांमध्ये कायद्यानुसार दंड भरून 'कंपाउंडिंग'द्वारे प्रकरण निकाली काढण्याची तरतूद आहे. दुसरीकडे, PMLA हा फौजदारी (Criminal) कायदा असून, गुन्ह्यातून मिळालेल्या पैशांच्या गैरव्यवहाराशी संबंधित आरोपांवर लागू होतो. त्यामुळे या दोन्ही कायद्यांतील प्रक्रिया आणि परिणाम वेगळे असतात.

दरम्यान, अलीकडेच वेदांता समूहावरील FEMA चौकशीचाही उल्लेख करत, या प्रकरणाचाही निकाल काय लागतो याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

ईडीच्या कारवाईच्या परिणाम कारकतेबाबतही विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले असून, तपास संस्थांच्या स्वायत्ततेबाबत आणि त्यांच्या कार्यपद्धतीतील पारदर्शकतेबाबत व्यापक चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे, केंद्र सरकार आणि ईडीने वारंवार आपल्या कारवाया कायद्याच्या चौकटीत आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारेच केल्या जात असल्याचे स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर, तपास यंत्रणांवरील जनतेचा विश्वास कायम राखण्यासाठी अधिक पारदर्शकता, वेळेवर माहिती आणि कायद्याची समान अंमलबजावणी आवश्यक असल्याची मागणी विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

# विवाह प्रोत्साहन योजनेचा लाभ घेण्याचे दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** दिव्यांग व्यक्तींचा विवाह ही एक संवेदनशील बाब असून सामाजिक समतेच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे दिव्यांग–अव्यंग वधू वर तसेच दिव्यांग–दिव्यांग वधू वरांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी दिव्यांग सक्षमीकरण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षेतर्गत विवाह प्रोत्साहन योजना राबविली जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टल येथे ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव डॉ. माणिक गुरसळ आणि आयुक्त सत्यजित बडे यांनी केले आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम १० अन्वये दिव्यांग व्यक्तींना प्रजननाचा हक्क आणि कुटुंब नियोजनाचे अधिकार आहेत. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २४ मध्ये "शासन आपल्या आर्थिक क्षमतेच्या आणि विकासाच्या मर्यादेत, दिव्यांग व्यक्तींना समाजात स्वतंत्रपणे राहता यावे, त्यांना पुरेसा राहणीमानाचा दर्जा मिळावा आणि त्यांच्या अधिकाराचे रक्षण करुन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक योजना आणि कार्यक्रम तयार करेल" असे नमुद केले आहे. त्यानुसार राज्य शासनाने दिव्यांग–अव्यंग विवाह योजनेत कालानुरूप बदल करून व दिव्यांग–दिव्यांग विवाह हा पर्याय नव्याने समाविष्ट करून नवीन शासन निर्णय १८ डिसेंबर २०२५ रोजी जारी केला होता.

त्यानुसार सामाजिक सुरक्षेतर्गत विवाह प्रोत्साहन योजनेतंर्गत दिव्यांग–अव्यंग विवाहासाठी रुपये १ लाख ५० हजार रुपये, दिव्यांग–दिव्यांग विवाहासाठी रुपये २ लाख ५० हजार रुपये, अनुदानाची पूर्ण रक्कम पती व पत्नीच्या संयुक्त बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे जमा करण्यात येईल. त्यापैकी ५० टक्के रक्कम संबंधित दाम्पत्याने ५ वर्षाकरिता मुदत ठेवीमध्ये ठेवावी लागणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी वधू अथवा वराकडे दिव्यांग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ४० टक्के अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्वाचे आधारसंलग्न वैध वैश्विक ओळखपत्र (UDIID) आवश्यक आहे. दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा तसेच वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी. विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा. विवाह झाल्यानंतर एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

लाभार्थ्यांनी शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या नमुन्यामध्ये व आवश्यक कागदपत्रे अजासीबत जोडल्याची पूर्ण खात्री करुन परिपूर्ण अर्ज जिल्हा कार्यालयांकडे सादर करावेत. जिल्हा कार्यालयाकडून अजार्ची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही बडे यांनी कळविले आहे.

# विभागीय सहसंचालक मनमानीमुळे निवृत्त शिक्षकेतर कर्मचारी ग्रंथपाल आणि प्राचार्यांवर अन्याय

**सोलापूर, कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच विद्यापीठ आणि अनुदानित महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनासह सर्व अनुषंगिक आर्थिक लाभ मिळतात. मात्र, उच्च शिक्षण विभाग आणि विभागीय कार्यालयांमधील समन्वयाअभावी या अधिकाऱ्यांच्या मनमानी अर्थबोधामुळे निवृत्त शिक्षकेतर कर्मचारी ग्रंथपाल आणि प्रार्चायांवर अर्जित रजेच्या रोखीकरण लाभांपासून वंचित राहावे लागत आहे.

**तोंडी सूचनांचा मनमानी कारभार**

राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी,ग्रंथपाल आणि प्राचार्य यांना २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू झाला आहे. या नियमानुसार, उन्हाळी व हिवाळी सुट्टी नसलेले शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथपाल आणि प्राचार्यांना निवृत्तीनंतर त्यांच्या खात्यावर शिल्लक असलेल्या जास्तीत जास्त ३०० दिवसांच्या अर्जित रजेचे रोखीकरण मिळणे अपेक्षित आहे. मात्र, गेल्या एक ते दीड वर्षापासून सोलापूर विभागीय सहसंचालक कार्यालयाने हे प्रस्ताव 'सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे' पाठवण्याच्या तोंडी सूचना दिल्या आहेत.

वेतन सातव्या आयोगाप्रमाणे आणि रजा रोखीकरण मात्र सहाव्या आयोगाप्रमाणे, अशा विचित्र पेचामुळे निवृत्त शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथपाल आणि प्राचार्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

**वरिष्ठ कार्यालयाकडून आदेश नाहीत**

या विसंगतीबाबत विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव यांना विचारणा केली असता, "सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे रजेचे रोखीकरण द्यावे असा यापूर्वीचा आदेश आहे.

त्यानंतर सातव्या वेतन आयोगाप्रमाणे रोखीकरण द्यावे असे स्वतंत्र आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून मिळणे आवश्यक आहे,

त्यांचे आदेश आल्यानंतर याची कार्यवाही होईल" असे उत्तर त्यांनी दिले.

**सहसंचालक बदलले की नियम बदलतात?**

सन २०१६ ते २०२४ या काळात निवृत्त झालेल्या कर्मचारी, ग्रंथपाल व प्राचार्यांना सातव्या आयोगाप्रमाणे याचे लाभ मिळाले आहेत. मग सहसंचालक बदलले की नियम बदलतात का? विशेष म्हणजे राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना समन्वय समितीच्या ७ मे २०२६ च्या अप्पर मुख्य सचिव वित्त विभाग यांनी आयोजित केलेल्या बैठकीत हा विषय निकाली काढण्यात आला आहे. परंतु अद्यापपर्यंत याचे आदेश या कार्यालयापर्यंत पोहोचले नाहीत. ही शासकीय अधिकाऱ्यांची दप्तर दिरंगाई आहे

**– दत्ता भोसले,** अध्यक्ष सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियन

# बार्शी आगाराला २० नवीन एसटी बसेस

## आ. राजेंद्र राऊत यांच्या पाठपुराव्याला यश



**बार्शी (कटूसत्य वृत्त) :** बार्शी शहरातील वाढत्या प्रवासी वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन आमदार राजेंद्र राऊत यांनी मंत्रालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेत बार्शी आगारासाठी २० नवीन एसटी बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या मागणीची गांभीर्याने दखल घेत परिवहन मंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असून, बार्शी आगाराला लवकरच २० नवीन बसेस देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. बार्शी हे मराठवाड्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते. सोलापूर जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरील या शहरातून दररोज मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राकडे मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रवास करतात. व्यापारी केंद्राबरोबरच बार्शी हे शिक्षण आणि आरोग्य सेवांचेही महत्त्वाचे केंद्र असल्याने येथे दररोज हजारो विद्यार्थी, रुग्ण आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते.

सोलापूर, बीड, लातूर, धाराशिव आणि मराठवाड्यातील इतर भागांतील विद्यार्थी शिक्षणासाठी, तर ग्रामीण भागातील अनेक रुग्ण उपचारासाठी बार्शीत येतात. मात्र, सध्याच्या बसफेऱ्या अपुऱ्या पडत असल्याने प्रवाशांना, विशेषतः विद्यार्थी आणि रुग्णांना, तासनतास बसची प्रतीक्षा करावी लागत असल्याची बाब आमदार राऊत यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

बार्शीच्या भौगोलिक व सामाजिक महत्त्वाचा विचार करून एसटी सेवेत वाढ करणे आवश्यक असल्याचे मत मांडत त्यांनी आगाराला तातडीने नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बार्शी आगारासाठी २० नवीन एसटी बसेस उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आश्वासन दिले.

नवीन बसेस उपलब्ध झाल्यानंतर बार्शी आगारावरील प्रवाशांचा ताण कमी होण्यास मदत होणार असून, विद्यार्थी, रुग्ण आणि सर्वसामान्य प्रवाशांना अधिक सुलभ व नियमित एसटी सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# खा. प्रणिती शिंदे एसआयआर जनजागृती मोहिमेसाठी थेट गावागावात



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):–** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) मोहिमेअंतर्गत एकही पात्र मतदार मतदार यादीपासून वंचित राहू नये, या उद्देशाने सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील विरवडे (बु.) सह विविध गावांमध्ये बीएलओ, बीएलए आणि काँग्रेस पदाधिकारी – कार्यकर्त्यासमवेत घरोघरी भेटी देत मतदारांशी संवाद साधला आणि एसआयआर मोहिमेबाबत व्यापक जनजागृती केली.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी नागरिकांना एसआयआर मोहिमेचे महत्त्व समजावून सांगत एनुमरेशन (गणना) फॉर्म अचूकपणे कसा भरायचा, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे कोणती, तसेच अर्ज वेळेत सादर करणे का आवश्यक आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या या विशेष मोहिमेत प्रत्येक पात्र मतदाराची अचूक नोंद होणे अत्यंत महत्त्वाचे असून, कोणताही पात्र नागरिक मतदार यादीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी जबाबदारीने सहभागी व्हावे, असे खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

गावागावांतील, वाड्या–वस्त्यांवरील तसेच वंचित आणि दुर्लक्षित समाजघटकांतील एकही पात्र नागरिक मतदार यादीपासून वंचित राहणार नाही, यासाठी बीएलओ, बीएलए आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी सतर्क राहून नागरिकांना आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन खासदार प्रणिती शिंदे यांनी केले. तसेच प्रत्येक पात्र मतदाराने स्वतः पुढाकार घेऊन एनुमरेशन फॉर्म वेळेत भरून संबंधित बीएलओंकडे जमा करावा. ही कालबद्ध प्रक्रिया असल्याने मुदतीपूर्वी आवश्यक कार्यवाही पूर्ण करून आपला मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी बीएलओंना निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार पूर्णपणे निष्पक्ष, पारदर्शक आणि जबाबदारीने काम करण्याचे आवाहन केले. कोणत्याही प्रकारच्या राजकीय दबावाला बळी न पडता पात्र मतदारांची नावे मतदार यादीत कायम राहतील याची दक्षता घ्यावी, तसेच कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव विनाकारण वगळले जाणार नाही याची खात्री करावी. एसआयआर प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची हलगर्जी होऊ नये, असेही त्यांनी सांगितले. तसेच, भाजपकडून काँग्रेस, विरोधी पक्ष तसेच पुरोगामी विचारांच्या मतदारांची नावे मतदार यादीतून कमी करण्याचे कारस्थान सुरू असल्याचा आरोप करत, काही राज्यांतील निवडणुकांदरम्यान अशा प्रकारच्या तक्रारी समोर आल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी एसआयआर प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, निष्पक्ष आणि नियमबद्ध पद्धतीने राबविण्यात यावी, तसेच प्रत्येक पात्र मतदाराचा मतदानाचा हक्क अबाधित राहील याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

गृहभेटीदरम्यान खासदार प्रणिती शिंदे यांनी ग्रामस्थांच्या विविध समस्या आणि स्थानिक प्रश्न जाणून घेतले. त्या समस्यांवर प्रशासनाशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. एसआयआर मोहिमेच्या माध्यमातून मतदार जागृतीसोबतच लोकांच्या अडचणी जाणून घेण्याचा हा उपक्रम असून, एकही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी काँग्रेस पक्ष गावागावांत सक्रियपणे जनजागृती करत असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, सुनील पवार, बालाजी माने, हरिश्चंद्र अवताडे, दत्तात्रय नामदेव अवताडे, संतोष अवताडे, डॉक्टर शंकर अवताडे, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, अशोक मिसाळ, गणपत अवताडे, शिवाजी कुंभार, यांच्यासह ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कांद्याचा प्रश्न विधान परिषदेत

## आ. राजेंद्र राऊत यांचा सरकारला जाब



**बार्शी (कटूसत्य वृत्त):–** कांद्याच्या दरातील सातत्याने होणारी घसरण, निर्यातबंदीमुळे शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान आणि दीर्घकालीन धोरणाच्या अभावाचा मुद्दा आमदार राजेंद्र राऊत यांनी विधान परिषदेत जोरदारपणे उपस्थित केला. कांद्याच्या प्रश्नावर दर दोन–तीन वर्षांनी निर्माण होणारे संकट टाळण्यासाठी राज्य सरकारने नियोजनबद्ध व दीर्घकालीन धोरण स्वीकारण्याची मागणी त्यांनी केली.

आ. राऊत म्हणाले की, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत दररोज सुमारे ७०० ते ८०० ट्रक कांद्याची आवक होत असून, बार्शीतील त्यांच्या खासगी बाजार समितीत हंगामात दररोज सुमारे ३०० ट्रक कांदा दाखल होतो. सोलापूर, धाराशिव, बीड तसेच मराठवाड्यातील मोठ्या प्रमाणातील कांदा या बाजारपेठांमध्ये येत असल्याने या भागातील शेतकऱ्यांच्या हिताचा सरकारने गांभीर्याने विचार करावा, असे त्यांनी सांगितले.

कांदा निर्यातबंदीच्या निर्णयावर टीका करताना त्यांनी सांगितले की, अचानक निर्यातबंदी लागू केल्यामुळे भारतावर अवलंबून असलेल्या परदेशी बाजारपेठा पर्यायी देशांकडे वळतात.

याचा दीर्घकालीन फटका भारतीय कांदा उत्पादकांना बसतो. त्यामुळे भविष्यात निर्यातबंदीचा निर्णय घ्यावाच लागल्यास तो नियोजनपूर्वक आणि टप्प्याटप्प्याने घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली. यंदा कांद्याच्या दरघसरणीमुळे मोठे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्रतिकिलो किमान पाच रुपये अनुदान देण्याची मागणीही त्यांनी विधान परिषदेत केली. तसेच कांदा साठवणूक चाळींसाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करून अधिकाधिक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळावा, असेही त्यांनी सांगितले.

रब्बी हंगामातील कांद्याचे उत्पादन वाया जाणार नाही, यासाठी राज्यात कांदा प्रक्रिया उद्योग उभारण्याची गरज असल्याचे आ. राऊत यांनी अधोरेखित केले.

कांदा पावडर, डिहायड्रेटेड कांदा आणि अन्य मूल्यवर्धित उत्पादनांच्या निर्मितीसाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने विशेष योजना राबविण्याची मागणी त्यांनी केली.

कांद्याच्या प्रश्नावर केवळ तात्पुरते उपाय न करता शेतकऱ्यांना स्थिर बाजारपेठ, योग्य भाव आणि प्रक्रिया उद्योगांची जोड देणारे सर्वसमावेशक धोरण राबविण्याची आवश्यकता असल्याचे मत आ. राजेंद्र राऊत यांनी विधान परिषदेत मांडले.

# धनगर समाजाच्या प्रश्नांसाठी कटिबद्ध

## भरघोस निधी देण्याची ग्वाही- आ. सचिन कल्याणशेट्टी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :** तालुक्यातील धनगर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असून, समाजाच्या कोणत्याही प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील. विकासकामांसाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यासही आपण मागे राहणार नाही, अशी ग्वाही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

अक्कलकोट येथील बिरदेव मंदिर परिसरात संत बाळूमामा सांस्कृतिक सभागृहाच्या भूमिपूजन समारंभात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, धनगर समाजाने आपल्या पाठीशी ठामपणे उभे राहत भरघोस मताधिक्याने निवडून दिले. या विश्वासाचे ऋण विकासकामांच्या माध्यमातून फेडण्याचा आपला प्रयत्न राहील. समाजाच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीबरोबरच विविध विकासकामांसाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भाजप हा सर्व जाती–धर्मांना समान न्याय देणारा पक्ष असून समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी कार्यरत असल्याचेही आमदार कल्याणशेट्टी यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी होते. यावेळी अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, समर्थनगरचे माजी सरपंच प्रदीप पाटील, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, जिल्हा परिषद सदस्य विकास बुळ्ळा, भाजप जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष नन्नू कोरबू, नगरसेवक लक्ष्मीकांत धनशेट्टी, विजय राठोड, विश्रांत गायकवाड, अप्पासाहेब बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात धनगर समाजाचे नूतन नगरसेवक संजय घोडके यांचा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक देवस्थान ट्रस्टचे सचिव स्वामीनाथ घोडके यांनी केले.

भूमिपूजन सोहळ्यास तालुका व शहरातील धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गंगाराम पुजारी, बरगली पुजारी, सदाशिव पुजारी, दशरथ कोरे, अशोक कोरे, कमल सोनटक्के, नंदा घोडके आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शंकर व्हनमाने यांनी केले, तर आभार काशीनाथ आलूरकर यांनी मानले.

# पालखी आगमनापूर्वी रस्ते दुरुस्ती युद्धपातळीवर करण्याची नागरिकांची मागणी



**माढा (कटूसत्य वृत्त):–** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर श्री संत मुक्ताई महाराजांची पालखी लवकरच माढा तालुक्यात दाखल होणार असताना पालखी मार्गावरील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली आहे. रिधोरे–पापनस मार्गे माढा शहरात येणाऱ्या पालखी मार्गावर मोठमोठे खड्डे पडल्याने वारकरी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अभिजित पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्यानंतर संबंधित ठेकेदारास नोटीस बजावण्यात आली आहे.

माढा ते पापनस हा सुमारे १२ किलोमीटरचा पालखी मार्ग अनेक ठिकाणी उखडला असून जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत. याशिवाय माढा ते शेटफळ या सुमारे २० किलोमीटरच्या रस्त्याचीही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. रस्त्याच्या दुतर्फा साईड पट्टीचे मुरमीकरण अपूर्ण असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्यांचे बांधकाम अवघ्या तीन ते चार वर्षांपूर्वी करण्यात आले होते. मात्र अल्पावधीतच रस्त्यांची झालेली दुरवस्था पाहता कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दुरुस्तीचे टेंडर पूर्ण झाल्याची माहिती असतानाही प्रत्यक्षात काम सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

पालखी मार्गावरील समस्या लक्षात घेऊन आमदार अभिजित पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने दुरुस्तीचे आदेश दिले. त्यानंतर विभागाने संबंधित ठेकेदारास रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवून आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत नोटीस बजावली आहे. मात्र नोटीस देऊनही कामाचा वेग अपेक्षित नसल्याने पालखी आगमनापूर्वी सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याची मागणी वारकरी, वाहनचालक आणि नागरिकांकडून होत आहे.

पालखी मार्गावरील प्रमुख समस्या
माढा–पापनस (१२ किमी) मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे.
माढा–शेटफळ (२० किमी) रस्त्याचीही गंभीर दुरवस्था.
रस्त्याच्या दुतर्फा साईड पट्टीचे मुरमीकरण अपूर्ण.
दुरुस्तीचे टेंडर पूर्ण होऊनही कामाला अद्याप गती नाही.
पालखी आगमनापूर्वी तातडीने दुरुस्तीची नागरिकांची जोरदार मागणी.


दैनिक
कटूसत्य च्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक :
जयकुमार गोरे
ग्रामविकास व पंचायत राज मंत्री, महाराष्ट्र राज्य
पालकमंत्री, सोलापूर जिल्हा


श्रध्दास्थान
दैनिक
कटूसत्य च्या
वर्धापन दिन निमित्त
हार्दिक शुभेच्छा
सचिन कल्याणशेट्टी
विधानसभा सदस्य, अक्कलकोट
जिल्हाध्यक्ष, भाजपा, सोलापूर पूर्व
: शुभेच्छुक :
भारतीय जनता पार्टी, अक्कलकोट विधानसभा